# 'बागिनी ग्लेशियर्स' उत्तराखंड!

'कंट्रीसाईड' या टूर कंपनीबरोबर एखादा ट्रेक करायचे असे बऱ्याच दिवसापासून मनात होते. त्या अनुषंगाने त्या कंपनीचे एक प्रतिनिधी किरण जाधव यांच्याशी आमचा संपर्क असायचा. एवरेस्ट बेसकॅम्प' करायचा म्हणून त्यांच्यासोबत दोन-चार बैठकाही झाल्या पण पुढील योग काही जुळून येत नव्हता. एक दिवस 'ट्रेक ए फोर्ट' या गिर्यारोहण गटाचे संचालक आणि रेखाचे भाऊ अभिनय यांनी पनवेलवरून फोन करून ट्रेकसाठी येताय का, असे विचारले. ट्रेक योगायोगाने 'कंट्रीसाईड'सोबत आणि तोही हिमालयात होता. दिनांक १७ ते २६ जून २०२२ असे दहा दिवस 'बागिनी ग्लेशियर्स'साठी जायचे होते. बागिनी ही उत्तराखंडमधील पंधरा हजार फूट उंचीवरील हिमनदी. तिच्यावरील त्या सुप्रसिद्ध ट्रेकविषयी खूपवेळा ऐकले होते. तिथे जाण्याची संधी मिळत आहे म्हटल्यावर आम्ही लगेच तयार झालो.

आठ-दहा दिवसात आमचा चौदा जणांचा एक ग्रुप तयार झाला. आम्ही दोघे,अभिनय, जितेंद्र, महेश, नयन, जान्हवी, महेशभाई,वंदना,अनुष्ना,अर्णव,अमित आणि विनोदकुमार. कंट्रीसाईडचे यतीन नामजोशी हे टूर लीडर म्हणून ठरले.मी आणि रेखाने यापूर्वी यतीनसोबत एक छोटा स्थानिक ट्रेक केला होता.आम्ही एकमेकांना आधीपासून ओळखत होतो.

१७ जूनला निघायचे होते. तयारीसाठी महिनाभराचा वेळ हाताशी होता. हा ट्रेक 'मध्यम अवघड' अर्थात 'मॉडरेट डिफिकल्ट' या वर्गात मोडणारा असल्यामुळे शारीरिक तंदुरुस्ती आवश्यक होती. आम्ही दोघे वयाने मोठे पण आमची शारीरिक-मानसिक तंदुरुस्ती उत्तम म्हणता येईल अशी. नियमितपणे फिरणे,अधुन-मधून गड-किल्ल्यांवर जाणे अशा सवयींमुळे प्रकृतीची आम्हाला चिंता नव्हती. तरीही रोज जाणीवपूर्वक चार-पाच कि.मी. चालायला सुरुवात केली.आहारावर लक्ष देऊ लागलो.

मध्येच एकदा वेळ काढून वरळीला 'डेकॅथलॉन'मध्ये जाऊन
काठ्या अर्थात वॉकिंग स्टिक्स, अंगावरच सुकणारे म्हणजे ड्रायफिट कपडे, पावसात आणि बर्फात वापरता येतील असे बूट, रात्रीच्या वेळी फिरताना लावायचा हेड-लॅम्प, तंबूमध्ये प्रकाशासाठी वापरायचा टेन्ट-लॅम्प, बॅटरी सेल्स, सोलर चार्जर, बॅक-पॅक अशी काही खरेदी केली. मागे 'चद्दर ट्रेक'साठी घेतलेले बरेच साहित्य सुस्थितीत होते, त्यातील काही गोष्टी आताही उपयोगी पडणार होत्या.

आठवडाभर आधीपासूनच बॅगा भरायला सुरुवात केली. मागच्या फेरीतील सामान बाहेर काढून, धुऊन, वाळवून रेडी करून ठेवले. सामान भरण्याच्या मोठ्या पिशव्या (डफल बॅग) आणि पाठ-पिशव्या (सॅक) कंट्रीसाईडकडून प्राप्त झाल्या.आवश्यक सामान, उबदार कपडे, खाऊ... अशी सगळी जय्यत तयारी झाली. दरम्यान वॉट्सॅपवर आमचा ग्रुप तयार झाला होता. त्यावरून विविध संदेशांचे आदान-प्रदान सुरु झाले. माहिती मिळत गेली. प्रश्नांची उत्तरे मिळत गेली. शंका दूर होत गेल्या.

थोडा मोकळा वेळ मिळताच 'बागिनी'संबंधी काही ठळक माहिती मिळवून संकलित करून ठेवली. बागिनीचा उच्चार वर हिंदी पट्ट्यात 'बाघिनी' असाही केला जातो. उत्तराखंडमध्ये चमोली जिल्ह्यातील जोशीमठ गावाजवळ असलेले गिर्यारोहणासाठीचे हे जगप्रसिद्ध ठिकाण. हौशी गिर्यारोहकांची पंढरी असे म्हटले तरी चालेल. उत्तराखंड तेथील धार्मिक स्थळांसाठी प्रसिद्ध राज्य. भाविकांसाठी देवभूमी! उत्तराखंड हा शब्द उच्चारताच प्रथम 'चारधाम यात्रा' हा संदर्भ नजरेसमोर येतो. भारतीय स्तरावरील चारधाम यात्रेत बद्रीनाथ (उत्तराखंड),द्वारका (गुजरात), जगन्नाथपुरी (ओडिशा) आणि रामेश्वरम (तमिळनाडू) या चार तीर्थक्षेत्रांचा समावेश होतो. तर उत्तराखंडमधील चारधाम यात्रेत बद्रीनाथ, केदारनाथ, गंगोत्री आणि यमुनोत्री या एकाच क्षेत्रातील चार तीर्थस्थळे येतात.उत्तराखंडमधील बद्रीनाथ हे एकमेव तीर्थस्थळ भारतीय पातळीवरील चारधाम यात्रेत समाविष्ट आहे हे लक्षात घेतले पाहिजे.

उन्हाळा, हिवाळा आणि पावसाळ्यात आपली वेगवेगळी रूपे दाखवणारा बागिनी ट्रेक. त्याचे अधिक खडतर रूप अनुभवायचे तर मे-जून हा कालावधी आणि तुलनेत थोडे सोयीचे रूप अनुभवायचे तर त्यासाठी सप्टेंबर-ऑक्टोबर हा कालावधी उत्तम. योगायोगाने आम्ही जूनमध्ये म्हणजे अगदी आदर्श हंगामात तिकडे चाललो होतो... अखेर निघण्याचा दिवस जवळ आला.

***

सकाळी साडेसहाला उठलो. चहा केली. रात्री रेखाने पुन्हा एकदा बॅगा नीट तपासून, भरून ठेवल्या होत्या. तरी त्यावर एकदा नजर टाकली. साडेनऊ वाजता 'उबेर' करून विमानतळावर आलो. अकरापर्यंत विमानतळावरील आवश्यक ती सगळी प्रक्रिया आटपून विमानाची प्रतीक्षा करीत बसलो. अभीनय ऊर्फ आणि त्याचा मित्र जितेंद्र पनवेलहून येऊन पोहोचले. आमच्याबरोबरच त्यांचेही
'चेक इन' झाले. 'कंट्रीसाईड'चे प्रमुख मिलिंद भिडेही विमानतळावर भेटले. ते त्याच विमानाने दुसरा ग्रुप घेऊन उत्तराखंडमधील कालिंदी ट्रेकवर निघाले होते.

पावणेबारा वाजता आम्ही विस्तारा कंपनीच्या विमानात स्थानापन्न झालो. काही वेळातच विमानाने आकाशात झेप घेतली. कॅप्टनने नेहमीप्रमाणे आपल्या आत्मविश्वासपूर्ण आवाजात ती नेहमीची घोषणा केली : 'फ्लाईंग टाईम' एक तास पन्नास मिनिटे वगैरे वगैरे...विमान तरंगायला लागले की मीह कल्पनेच्या विश्वात तरंगायला लागतो... यावेळी श्वासावर लक्ष केंद्रित करण्याचे माझे प्रयोग सुरू झाले. मध्येच विमानात खाऊ आला, जेवण मिळाले.एकूण मस्त वाटत होते.आणि मग अडीच वाजता डेहराडून विमानतळ! तेथील तपमान अठ्ठावीस अंश सेल्सिअस.

आमच्या गटातील जान्हवी नावाची एक मुलगी मागच्या विमानाने येणार होती. म्हणून आम्ही विमानतळावरच फोटो काढणे वगैरे उद्योग करत बसलो. एकमेकांशी जुजबी ओळखी झाल्या.थोड्या वेळात अंगाखांद्यावर वेगवेगळ्या बॅगा घेतलेली जान्हवी येऊन पोहोचली. मग आम्ही सगळे बाहेर पडलो. नेहमीच्या शहरी खुणा मागे टाकत, गर्द होत गेलेल्या झाडीतून रस्ता मागे मागे टाकत डेहराडून सोडले.

पुढे काहीवेळाने 'राजाजी नॅशनल पार्क'क्षेत्रात प्रवेश झाला.  एक भलामोठा हत्ती समोरून येताना दिसला. त्याला रस्ता ओलांडून पलीकडे जायचे होते. रहदारी दोन्ही बाजूने थांबली. अर्थातच फोटो काढणे वगैरे झाले. गजांतलक्ष्मीचे ते अकस्मात दर्शन आनंदाचा आणि आश्चर्याचा धक्का देऊन गेले. खरे सांगायचे तर मला तो एक शकुनच वाटला.

वाटेत ऋषिकेश. १९६८साली 'बिटल्स' या इंग्लिश रॉक बँडच्या टीमने ध्यानधारणा,आत्मसाक्षात्कार, सत्यशोधन, आणि व्यसनमुक्तीच्या अनुषंगाने तेथील महर्षी महेश योगी आश्रमास भेट दिली होती. साऱ्या जगातील माध्यम-प्रतिनिधींचे या भेटीकडे लक्ष लागले होते. मुख्य म्हणजे John Lennon या कवी-संगीतकाराचा त्या टीममध्ये समावेश होता. Life is what happens when you are busy making other plans हे  ब्रह्मवाक्य जगाला देणारा लेनन हा कोणत्याही संवेदनशील माणसाने चटकन प्रेमात पडावे असा प्राणी. त्याचे हे विधान मी याच पुस्तकातील माझ्या मनोगतात संदर्भासह उद्धृत केले आहे. ऋषिकेश पार करताना मला हे आठवले. हल्ली तेथील गंगेची आरती आणि त्यासाठी जमणारी भाविकांची मांदियाळी हा चर्चेचा विषय असतो.

ऋषिकेशहून हरिद्वार एका तासाच्या अंतरावर. योगाभ्यासाच्या दृष्टीने ते देशातील सर्वाधिक पसंतीचे ठिकाण.पतंजली योगपीठ अर्थात रामदेव बाबा आणि त्यांच्या विविध उपक्रमांनी आता ते आधिक प्रसिद्धीस आले आहे. उत्तराखंड आणि उत्तरेतील अनेक ठिकाणच्या गिर्यारोहणासाठी हरिद्वार ही एक प्रकारे 'तळ-छावणी'  (बेस कॅम्प)मानली जाते. देशाच्या विविध भागातून पर्यटक सतत तेथे येत असतात. राफ्टिंग अर्थात 'साहसी नौका-चालन' हाही अलीकडे त्या भागात लोकप्रिय झालेला एक मोठा क्रीडाप्रकार. त्यासाठी वरच्या दिशेने बोटी वाहून नेणाऱ्या गाड्या जागोजागी दिसत होत्या.

वाटेत देवप्रयाग येथे अलकनंदा आणि भागीरथीच्या संगमावर थांबलो. येथून पुढे ती गंगानदी म्हणून ओळखली जाते. फोटो काढले. मातकट-गढूळ आणि नीळसर-हिरवा रंग एकत्र येताना, एकमेकात मिसळत असताना पहायला मिळणे हा एक दुर्मिळ योग. लडाखमधील झंस्कार आणि स्पिती या दोन नद्यांच्या संगमाची आठवण मनात ताजी झाली. संगमापाशी नद्यांचे पाणी एकमेकात मिसळताना आधी त्यांचा संघर्ष होतो. जणू दोन संस्कृतींचाच संघर्ष होत आहे. मग थोड्या पुढे जाऊन त्या एकमेकींशी जुळवून घेत एकरूप होऊन जातात... पुढची सारी भूमी सुजलाम सुफलाम करीत नंतर समुद्राला मिळतात किंवा एखाद्या वाळवंटात लुप्त होऊन देवप्रयाग येथील अतिशय नेत्रसुखद असा तो संगम पाहून चित्तवृत्ती बहरून आल्या.

आमच्या गाडीत अभी, जितेंद्र, मी आणि रेखा. अभी आणि जितेंद्र एकमेकांचे मित्र. जितेंद्रचा स्वभाव मिश्कील,गप्पिष्ट. तो फोटोही छान काढतो. आमची आधीची ओळख होती. छोट्या-मोठ्या ट्रेकना आम्ही सोबत असायचो. आम्ही बाजूबाजूला बसलो होतो. ते दोघे आर्किटेक्ट, मी लेखक आणि रेखा सहनशील श्रोता. प्रवासात सतत माझे काही ना काही लालित्यपूर्ण समालोचन सुरू असायचे. 'मुंबईला परत जाईपर्यंत मीसुद्धा आता काही कथा-कविता लिहू शकेन' असे जितेंद्र म्हणाला तेव्हा सारे हसले. एकूण सूर चांगले जुळले होते.

संध्याकाळी साडेसात वाजता रुद्रप्रयाग येथे 'हॉटेल रिव्हर साईड रिसॉर्ट'वर आलो. अलकनंदेच्या काठी एका सुंदर डोंगरउतारावर उभारलेले टुमदार हॉटेल.जेवणापूर्वी यतीनने सर्वांना पुढील प्रवासाची तपशीलवार माहिती दिली. सुरक्षिततेच्या दृष्टीने विविध सूचना दिल्या. काय करावे, काय करू नये याची माहिती दिली.'गिर्यारोहण म्हणजे स्पर्धा नाही, स्वतःचा रिदम पकडा' असे त्याने सांगितले.
ते मला खूप आवडले.

रात्री नऊ वाजता जेवण झाले. मग दीड-दोन तास बाहेर सारे गप्पा करत बसलो. जान्हवीशी गप्पा झाल्या. पाळीव प्राणी-पालन (पेट ग्रूमिंग) हा तिचा व्यवसाय. मी त्याविषयी प्रथमच ऐकत होतो. कुत्री आणि मांजरे हे तिचे कार्यक्षेत्र. मग प्राण्यांच्या भावना ओळखणे, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांची जीवनशैली असे सारे विषय बोलून झाले.

सतत हसऱ्या आणि उत्साही महेशभाईंची ओळख झाली. पन्नाशीतील आनंदी गृहस्थ. मनासारखे जगता यावे म्हणून उत्तम चाललेला सनदी लेखापालाचा(सी.ए.) व्यवसाय सोडून त्यांनी निवृत्ती घेतलेली. आता छान एन्जॉय करत फिरत आहेत. त्यांना माझे आणि रेखाचे खूप कौतुक वाटले. आम्ही दोघे नेहमी सोबत फिरतो का, असे त्यांनी विचारले आणि आम्ही हो म्हणताच त्यांना जणू आश्चर्य वाटले. त्यांच्या पत्नीला फिरण्यात रस नाही. ती देवधर्म, पूजाअर्चा यात अधिक गुंतलेली, पण अतिशय शिस्तीची बाई. कोणत्या दिवशी कोणते कपडे घालायचे, सकाळी कोणते, संध्याकाळी कोणते याची एक यादीच त्यांनी महेशभाईंना तयार करून दिली होती. इतकेच काय पण त्यांची बॅगही त्याच क्रमाने भरून दिली होती. महेशभाईंची अभिरुचीसंपन्न वेशभूषा आणि शिस्तीने भरलेली बॅग हा पुढे कायम आमच्या चर्चेचा आणि चेष्टा-मस्करीचा विषय ठरला.

टेरेसवर फिरताना अमित,विनोदकुमार आणि अर्णव या तीन मित्रांची जवळून ओळख झाली. शतपावली करत त्यांच्याशी आणखी गप्पा झाल्या. आमचे वय लक्षात घेऊन आमच्या एकूणच फिरण्याच्या छंदाविषयी त्या साऱ्यांना कौतुक होते. पुढच्या संपूर्ण टूरमध्ये अमितने आमच्या दोघांचे छान छान फोटो काढून देण्याची कामगिरी स्वेच्छेने पार पाडली.

खोलीत आलो.रात्र झाली तरी खिडकीवरच्या कोनाड्यात बुलबुलांचे चटरपटर सुरू होते. कदाचित नर आणि मादीची सुसंवादाची वेळ असेल. किंवा नुकत्याच जन्माला आलेल्या पिल्लांना 'कसे जगावे' याचे धडे ते देत असतील... दूरवर डोंगरातील घरे, तेथे लागलेले दिवे, गाड्यांची रहदारी दिसत होती. खाली अखंडपणे वाहणारी अलकनंदा. तिच्या वाहण्याचा घनगंभीर आवाज सुरूच होता...

मोबाईल आणि पॉवरबँक नीट चार्ज करून घेतली. अंथरुणावर पडलो.'गिर्यारोहण म्हणजे स्पर्धा नाही, स्वतःचा रिदम पकडा' हे यतीनचे वाक्य आठवले. गडकिल्ल्यांच्या भ्रमंतीमधील तो पहिला धडा यापूर्वी अनेकदा कानावरून गेला आहे. एकूणच माणसाला स्पर्धाविरहित जगता आले तर जगण्याचा जास्तीत जास्त आनंद घेता येईल यात शंका नाही... डोळे मिटून घेतले. जंगली हत्तीचे दर्शन आणि त्यानंतर अलकनंदा-भागीरथीचा संगम या दोन्ही गोष्टी

नजरेसमोर आल्या...टूर छान होणार अशी लक्षणे दिसत होती. विचार करता करता कधी निद्रादेवीच्या आधीन झालो ते कळलेच नाही.

***

सकाळी लवकर जाग आली. बाहेर पाहतो तर चांगले उजाडले होते. पण घड्याळात फक्त सव्वापाच झालेले. झोप चांगली झाली होती. चित्तवृत्ती प्रसन्न होत्या. रेखा उठली. समोर चहाचे साहित्य खुणावत होते.चहा झाला. सर्व आवरून झाले. साडेसात वाजता नाश्ता आणि त्यानंतर  पुढील प्रवासासाठी निघायचे होते. तोवर बराच वेळ हाताशी होता. रेखा म्हणाली आपण फिरायला जाऊया. टेरेसवर आलो. तेथे महेशभाई फेऱ्या मारत होते. ते सोबत आले. एक छोटी पायवाट पकडून आम्ही नदीपर्यंत गेलो. काठावर बसून तिचा प्रवाह न्याहाळला. पाणी जोरदारपणे वाहत होते. त्याच्या वाहण्याचा आवाज लक्षपूर्वक ऐकला, काना-मनात भरून घेतला. आमच्या पोलादपूरच्या सावित्री नदीची आठवण आली. तिच्या काठी डुंबण्यात, मासेमारी करण्यात माझे बालपण गेले. ते दिवस आठवले...एकदम एक टिटवी समोरून उडून गेली तशी  विचारांची साखळी तुटली. मी पुन्हा स्वतःला वास्तवाशी जोडून घेतले. वर एक घार मंडले घालत होती. हॉटेलच्या मागे डोंगरउतारावर बहाव्याची झाडे फुलली होती. आकाश ढगांनी भरले होते.पूर्वदिशा उजळत होती. समोर एकामागे एक अशा चार-पाच डोंगररांगा दिसत होत्या. ढगातून गाळून येणाऱ्या त्यांवरील प्रकाशयोजनेचे गारुड पहात पहात पुन्हा वर आलो.

वंदना आणि त्यांची मुलगी अनुष्ना दिल्लीवरून स्वतंत्रपणे निघाल्या होत्या. त्या रात्री अकराला हॉटेलवर पोहोचल्या. सकाळी सकाळी त्यांची ओळख झाली. पुढे हळूहळू त्यांच्याशी परिचय वाढत गेला...काही वेळाने नाश्ता करून गाडीत बसलो. बाहेर पडेपर्यंत पावसाला सुरुवात झाली होती. मनाशी विचार आला; आज-उद्या पाऊस चालेल पण ट्रेक सुरू झाल्यावर तो आला तर मात्र परिस्थिती अवघड होईल. अर्थात निसर्गाने कसे वागावे ते आपल्या हातात थोडेच असते? उलट आपल्यालाच त्याच्यासोबत जुळवून घ्यावे लागते... 'जो होगा सो देखा जायेगा' असे म्हणत आम्ही मार्गाला लागलो.

अलकनंदेच्या किनाऱ्याने गाड्या वर निघाल्या. रस्ते छान होते. नदीचे पात्र आपली विविध रूपे दाखवत होते. कधी विशाल, कधी चिंचोळे, कधी खळाळणारे, कधी संथ! रस्त्यावरील बहुतेक गाड्या यात्रेकरू आणि राफ्टिंगसाठी बोटी वाहून नेणाऱ्यांच्या. एकीकडे उंच उंच डोंगर, दुसरीकडे खोल खोल दऱ्या. मध्येच एखाद्या डोंगराचा एखादा भूभाग तुटून खाली कोसळल्याचे दिसायचे. त्यामुळे उघडा पडलेला डोंगराचा आतील भाग दिसायचा. उघडी पडलेली ताजी माती, मुरूम,खडक दिसायचे. भूस्खलन ही उत्तराखंडातील नेहमीची बाब. कोणत्या क्षणी काय होईल हे सांगता येत नाही अशी परिस्थिती. ते भय तिकडे फिरताना सतत सोबतीला असते. आणि तिकडच्या दऱ्या इतक्या खोल की एखादी गाडी खाली गेली तर ती वर काढण्याच्या भानगडीत न पडणे हा तिकडे व्यावहारिक शहाणपणाचा भाग मानला जातो!

मध्येच एकदम अंधारून आले. ढग रस्त्याच्या अगदी कडेला चिकटून अवतीर्ण झाले. जणू ते आमच्या सोबतीनेच निघाले आहेत. गाडीच्या डोक्यावर एक छोटा ढग दिलखुलासपणे बरसला. पावसाच्या ताज्या धारा थेट गाडीवर कोसळायला लागल्या. बाहेर पडून आ करून वर बघितले असते तर गाईचे धारोष्ण दूध तिच्या आचळातून थेट तोंडात जावे तसे वाटले असते...हा माझ्यासाठी एक विलक्षण अनुभव होता.

प्रत्येक वळणावर नवा डोंगर समोर यायचा. डोंगरातून वळत वळत जाणाऱ्या तीव्र चढ-उताराच्या वाटा. मिनिटा-मिनिटाला बदलणारे वातावरण. कधी ढग, कधी धुके, कधी उन्हाची तिरीप तर कधी पावसाच्या धारा!

सव्वादहा वाजता रुद्रप्रयागला पोहोचलो. तेथे अलकनंदा आणि मंदाकिनी या नद्यांचा संगम. देवप्रयाग, रूद्रप्रयाग, कर्णप्रयाग, नंदप्रयाग, आणि विष्णूप्रयाग असे पाच प्रयाग या प्रवासात लागतात. प्रत्येक प्रयागावर नद्यांचे संगम. त्यात सर्व ठिकाणी अलकनंदा ही समान नदी. प्रयाग म्हणजे यज्ञयाग करण्याचे ठिकाण. नद्यांचा संगम होतो त्या ठिकाणालाही प्रयाग मानले जाते. गंगा,यमुना आणि सरस्वती यांचा त्रिवेणी संगम हे साधुसंतांचे, कलावंतांचे, चित्रकारांचे, लेखक-कवींचे प्रेरणास्थान. एकूणच सृष्टीचे ऊर्जाकेंद्र.आम्ही आता त्या सृजनशील भोवतालाचा एक भाग झालो होतो... किती विलक्षण अनुभूती होती ती!

रुद्रप्रयाग हे मस्त तरतरीत गाव. बाजारपेठेतून गाडी  निघाली. फळे, भाजीपाला, लिंबू-मिरची-कोथिंबीरीचे ढिगारे, कांदे-बटाटे, कोबी, टोमॅटो,मके, माणसांची गर्दी! 'पुष्पा' चित्रपटामुळे प्रसिद्धीच्या झोतात आलेल्या रश्मिका मंदानाचे पोस्टर एका दुकानाच्या फळीवर दिसले. दक्षिणेतून एका झटक्यात उत्तरेत पोचलेली नायिका. सिनेमा हे लोकशिक्षणाचे झाले नसले तरी दळणवळणाचे किती प्रभावी माध्यम आहे हे लक्षात आले. संपूर्ण देशाला जोडणारी एकमेव गोष्ट म्हणजे हिंदी सिनेमा आणि हिंदी सिनेसंगीत. गाडीतही अर्थातच गाणी सुरू होती...

ऋषिकेशपासून कर्णप्रयागपर्यंत भूमिगत रेल्वेचे काम सुरू आहे. त्यातील टनेलचे काम रुद्रप्रयागजवळ पाहायला मिळाले. उत्तराखंडमधील चारीधाम जोडणारा हा नवा  प्रकल्प. तो चांगला की वाईट हा चर्चेचा मुद्दा पण त्या अनुषंगाने प्रचंड कामे सुरू होती. सव्वाअकरा वाजता कर्णप्रयाग आले. तेथे अलकनंदा आणि पिंडार या दोन नद्यांचा संगम... एका रेस्टॉरंटमध्ये थांबून चहा घेतला आणि जोशीमठच्या दिशेने पुढे निघालो. पाऊस सुरूच होता. मनोमन त्याची प्रार्थना सुरू होती की 'थांब बाबा!' पण तो काही ऐकायला तयार नव्हता.

दुपारी एक वाजता चमोली या जिल्ह्याच्या ठिकाणी  पोहोचलो.आजूबाजूला ढगच ढग. हिरवेगार डोंगर. देवदार, पाईन, पर्च, ओक, विलो, पॉप्लर आणि ऱ्होडेडेन्ड्रॉनची गर्दी... दृश्यांची चित्रचौकट हळूहळू बदलत होती.आता ती अधिक वेल्हाळ होत चालली होती. आम्हाला जणू आपल्या पाशात सामावून घेत होती. आपलेसे करीत होती. पर्वतरांगा इतक्या की त्या नजरेत साठवून घेताना जत्रेत हरवून जाणाऱ्या मुलासारखी स्थिती होत होती.

वाटेत एका ठिकाणी डोंगरउतारावर जर्दाळूची बाग दिसली. गाड्या थांबल्या. फांद्याफांद्यांना लगडलेले हिरवे-हिरवे, हिरवट-पिवळे, सोनेरी रंगाचे पिकलेले जर्दाळू. एक म्हातारा राखणदार पुढे आला. खालून काही बायकाही वर

आल्या. त्यांनी उदार मनाने आम्हाला त्या रसरशीत फळांचा आस्वाद घेण्यास अनुमती दिली. ताजे ताजे जर्दाळू काढून हातात दिले. आम्ही हावरटासारखी काही फळे तेथेच स्वाहा केली. वर खिसेही भरून घेतले. निघताना त्यांना काही पैसे दिले पण ते त्यांनी मागितले नव्हते हे मुद्दाम सांगितले पाहिजे. पहाडातली माणसं दिलदार, निर्मळ मनाची, पर्यटकांच्या आनंदात आनंद मानणारी. शहरी माणसाकडचे छक्केपंजे त्यांना माहीत नसणारी. त्यांची प्रतिष्ठा आपण नेहमीच जपली पाहिजे असा विचार मनात आला.

जोशीमठ आले. तेथून धुक्यातून, ढगातून, तीव्र चढणीने वर वर चढत ऑलीला पोहोचलो. डोंगर उतारावर खूप मोठा रिसॉर्ट.तिकडे सपाट जमिनीचा जवळपास अभाव. खालून बॅगा घेऊन वर जायचे तरी जणू एक छोटा ट्रेक व्हायचा. खोल्या ताब्यात घेईपर्यंत वर-खाली खूप फिरावे लागले. त्यात प्रचंड थंडी. सगळ्या खोल्या गारठलेल्या. अनुष्का आजारी पडली म्हणून यतीन मागे थांबून तिला डॉक्टरकडे घेऊन गेला होता. आमचा दहा जणांचा ग्रुप पुढे आलेला. जेवण व्हायला साडेचार-पावणेपाच झाले. मग तिथेच आम्ही गप्पा मारत बसलो. थंडी वाढत चालली होती. साडेपाच वाजता खोलीवर आलो. समोर पर्वतांच्या एकामागे एक अशा सुस्नात रांगा. वर जागोजागी ढग. अडकलेले, तरंगणारे, मागेपुढे सरकणारे, पळणारे, एकाच जागी हट्टाने थांबणारे!पावसाचा झिरझिरीत पडदा. प्रकाशाची उघडझाप. अनोखी शांतता.स्वप्नवत वातावरण...

आमच्या खोलीला मोठमोठ्या खिडक्या होत्या. त्यातून आकाश, पर्वत आणि शिखरांवरील चकाकणारे बर्फ दिसत होते. पण चावऱ्या थंडीमुळे बाहेर पडता येत नव्हते. खोलीत आल्याआल्या फ्लीस जॅकेट घातले. कानटोपी घातली.गळ्याभोवती मफलर गुंडाळली तेव्हा कुठे बरे वाटले. पण तरीही आता बाहेर फिरायला जाणे मुश्कील होते. उद्या काय परिस्थिती होईल याचाही अंदाज येत नव्हता. तब्येत उत्तम राखली तर ट्रेक पूर्ण करता येईल, मजा येईल. म्हणून उगाच काही साहस करण्याच्या भानगडीत पडू नये असे ठरवले.

त्यातच लाईट गेली. चहाला गरम पाणी नाही. चार्जिंग करता येत नाही. टीव्ही बंद.लाईट कधी येईल सांगता येत नाही... दुसऱ्या दिवशी गॉर्शन ब्युग्याल हा 'सराव ट्रेक' करायचा होता. तो अर्थात पावसावर अवलंबून असणार होता. कसे होणार? मी उगाचच काळजीत पडलो. संध्याकाळी सात वाजेपर्यंत पाऊस सुरू होता त्यामुळे आता आपले काही खरे नाही असे वाटत होते. पण रात्री पाऊस थांबला. जिवात जीव आला. यतीनने रात्री साडेआठ वाजता येऊन दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाची माहिती दिली. मग निवांत झोप.

***

सकाळी साडेपाच वाजता जाग आली. उठून बसलो. सर्व बाजूंनी ढगांनी आणि बर्फाने आच्छादलेली शिखरे. सोसवेल इतपत दयाळू थंडी. रेखा उठली. चहा ठेवला. पाणी उकळत असताना त्याचा आवाज येत होता. मला 'देरसू उझाला' या सुप्रसिद्ध कादंबरीतील त्याच नावाच्या मध्यवर्ती पात्राची आठवण झाली. उकळणाऱ्या पाण्याला तो 'पाणी किंचाळत आहे' असे म्हणायचा. पाण्याला जीव असतो हे सगळ्यांनाच माहीत आहे पण उकळणारे पाणी किंचाळत आहे असे म्हणणारा देरसू किती संवेदनशील माणूस असेल हे लक्षात येत होते. काही क्षण तो आवाज मी अधिक लक्ष देऊन ऐकू लागलो. पाण्याच्या अंगाला चटके बसत आहेत आणि ते खरोखरच किंचाळत आहे असे

मलाही वाटू लागले. पण काय करणार? थंड चहाची आणि तीही हिमालयात - मी कल्पनाच करू शकत नव्हतो! पण पाण्याविषयी कृतज्ञतेची संवेदना मनात कायम जागी असायला हवी असे स्वतःला बजावले.

बाहेर आलो.आम्ही आता जवळपास सात हजार फूट उंचावर होतो. सर्व बाजूंनी आकाशात गेलेले डोंगरांचे सुळके. समोर क्षितिजापाशी वेगवेगळ्या आकाराचे पहाड. एका पहाडाने आपला एक हात बाहेर काढून वर उंचावला होता. त्यावर उगवत्या सूर्याची पहिली किरणे पडली. त्या पाठोपाठ दुसऱ्या पहाडाच्या टाळूवर सूर्यकिरण पडले. मग ते उजव्या हाताला असणाऱ्या आणखी एका पहाडाच्या छातीवर पडले, तोही भाग प्रकाशित झाला.वर ढग दाटून आले होते. त्या गर्दीतून जागा मिळेल तेथून सूर्यकिरण बाहेर यायचे आणि खालचे दृश्य त्यांच्या मर्जीप्रमाणे प्रकाशमान करून टाकायचे. हळूहळू डावीकडील पर्वतशिखरांवर अशीच प्रकाशयोजना सुरू झाली.

कमालीची शांतता होती. ती अनुभवावी यासाठी अनेकजण हिमालयात येतात. काल दुपारी येथे आलो आणि हळू हळू आम्हालाही शांततेची सवय होत गेली. चटक लागत गेली. मुंबईतील धावपळ, गडबड-गोंधळ, पळापळ, चारही बाजूंनी अंगावर येणारे कर्णकटू आवाज, राक्षसी स्पर्धाशील वृत्ती... सारे मागे पडत गेले. मी जणू त्या शांततेचा एक भाग बनून गेलो.

शरीराचे आणि मनाचे घड्याळ हळूहळू बाहेरच्या गतीशी जुळवून घेत होते. थंडीही आता सहन होत होती. तिचा त्रास होत नव्हता. तपमान बारा अंश सेल्सिअस इतके होते. रात्री ते आठ अंश इतके कमी झाले होते. त्या तुलनेत बारा हे तपमान सहन करता येईल असे होते. वातावरण स्वच्छ होते. पावसाची शक्यता नव्हती.त्यामुळे गॉर्शन ब्युग्याल ट्रेक सुखद होईल असा दिलासा मिळाला. गॉर्शनचा उच्चार गर्सन असाही केला जातो. त्याला काहीजण गॉर्सो असेही म्हणतात...ब्युग्यालचा अर्थ कुरण.

गिझर सुरू करायला गेलो पण नंतर लक्षात आले की लाईट नाही. ती एवढ्यात येण्याची शक्यताही नव्हती. त्यामुळे मिळाले त्या पाण्याने हातपाय तोंड धुतले.सात वाजता  ऊन पडले. छान, प्रसन्न वाटले. आम्ही दोघेही नाश्त्यासाठी खाली उपहारगृहात आलो. एकेक करून सारे  जमले. तेथून ट्रेकसाठी बाहेर पडायला नऊ वाजले.
रिसॉर्टच्या वरच्या भागात असणाऱ्या 'केबल-कार'मध्ये बसून पहिल्या डोंगराच्या माथ्यापर्यंत गेलो. त्या सुंदर पाळण्यातून तरंगत तरंगत, खालचा परिसर न्याहाळत वर जाणे हा आनंद शब्दातीत होता. गर्दी नव्हती त्यामुळे संथ लयीत सारे व्यवहार सुरू होते. वातावरणात एक प्रकारचा ठेहेराव होता. त्यामुळे छान वाटत होते. डोंगरमाथ्यावर उतरलो. तेथून 'गॉर्शन ब्युग्याल'च्या दिशेने चढाईला सुरुवात केली...

ऊन आणि पाऊस दोन्ही शक्यता गृहीत धरून दोन्ही प्रकारचे कपडे सोबत घेतले होते. प्रत्येकी दोन लिटर पाणी सक्तीचे होते. शिवाय पॅक लंच, खाऊ, टोप्या, काठ्या असा जामानिमा होता. हळूहळू वर चढू लागलो. गोल्डन ओकचे जंगल सुरू झाले. दोन-तीन टप्प्यावर विश्रांती घेत, दमत दमत,रमत गमत वर वर, सर्वच ठिकाणी असते तशा त्या स्थानिक देवळापर्यंत गेलो.तेथे थोडी विश्रांती झाल्यावर मग अधिक मोठमोठ्या वृक्षांचा,घनदाट जंगलाचा टप्पा सुरू झाला.तो संपल्यावर मग विस्तीर्ण कुरणांचे क्षेत्र सुरू झाले. हिमालयातील अशी उंचावरची कुरणे

'अल्पाइन मिडोज्' या प्रकारात मोडतात. पायथ्याकडच्या भागातील जंगल संपवून वर गेले की एकदम सीन ट्रान्सफर व्हावा तशी ही कुरणे नजरेस पडतात. कित्येक हेक्टरचा विस्तार असणारी, हिरवेगार गालिचे आणि त्यावर विविध आकाराच्या विविध रंगांच्या फुलांची सुंदर सुंदर वेलबुट्टी मिरवणारी मखमली पठारे.

आजूबाजूला इतक्या विविध प्रकारची फुले फुलली होती की त्यांना कसे सामोरे जावे हेच कळत नव्हते. निळी, जांभळी, पिवळी, लाल, फुलेच फुले. कोवळ्या पोपटी गवताचा मखमली गालीचा. अंगोपांगी लपेटून राहिलेली स्वच्छ निर्मळ हवा. स्वच्छ निळे आकाश. कुठे कचरा नाही की कसली अडगळ नाही. जगणे असेच निर्मळ सुंदर असायला हवे असे वाटले. 'वाटले' कशाला? त्या क्षणी ते तसेच होते आणि तो साक्षात्कार माझ्यासाठी अतिशय मौलिक होता. प्रत्येकाची जवळपास तशीच अवस्था झाली होती.

पावसाने कृपा  केली होती त्यामुळे आमचा हा ट्रेक अगदी सुफळ संपूर्ण  झाला. नऊ ते दीड असा सुमारे साडेचार तासाचा अफलातून ट्रेक.उंची ३५१९ मीटर. जोशीमठपासून अंतर सुमारे वीस किलोमीटर. शेकडो हेक्टर विस्तीर्ण पसारा.घनदाट जंगले आणि सुंदर कुरणांनी व्यापलेला नितांत सुंदर भूभाग.

माथ्यावरील डोंगराचा नैसर्गिक उतार तसाच ठेवून तेथील वनविभागाने फुलांसाठी छोटे छोटे, सुंदर सुंदर भाग तयार केले आहेत. त्यांची व्यवस्थित जोपासना केली आहे. त्यामुळे त्यातून हळुवारपणे फिरता येते...हिरवळ इतकी लालस आणि मोहक होती की रेखा तिच्यावर लहान मुलीसारखी लोळायला लागली. जवळपास प्रत्येकाची अशीच अवस्था  झाली होती. मग गवतावर लोळण्याच्या वेगवेगळ्या पोजेस आणि त्यांचे फोटो असा सोहळा झाला.

आदल्या दिवशी सगळेजण निराशेने ग्रासलेले आणि कंटाळलेले होते. आज मात्र परिस्थिती बदलली होती. निसर्ग अगदी प्रसन्न झालेला. घेता किती घेशील दो कराने अशी स्थिती झालेली. क्षणभर हिमाचल प्रदेशातील 'रघुवीर फोर्ट ट्रेक'ची आठवण माझ्या मनात जागी झाली. एका प्रशस्त जागी बसून सर्वांनी लोणचे-पराठे-केळी अशा फराळाचा आस्वाद घेतला. तेथून निघावे असे वाटत नव्हते पण इलाज नव्हता.

ऑलीवरून खाली येताना पोट गडगडायला लागले. तीन चार दिवसाचा विचित्र प्रवास, उलट-सुलट खाणेपिणे, जागरण यामुळे शरीरधर्माच्या नेहमीच्या वेळापत्रकात गडबड झाली होती. पोट रिकामे करण्यासाठी हॉटेलपर्यंत पोहोचू असे वाटत होते.पण ते शक्य झाले नाही.मग मी  रांगेतील सगळ्यात शेवटचा नंबर धरून चालू लागलो. कोणी पाहत नाही असे बघून एका झाडाच्या आडोशाला जाऊन मोकळा झालो. सोबत पाणी होते. एकदम स्वच्छ, मोकळे, प्रसन्न  वाटले...अशा ठिकाणी शहरी शिष्टाचार निरर्थक ठरतात हे मी अशा प्रवासातच शिकलो आहे. मागे एकदा लडाखमध्ये स्पिती व्हॅलीत फिरताना असेच जोरात लघवीला झाले होते आणि इतर कोणालाही कळणार नाही अशी माझी फजिती झाली होती. एकदा लेहच्या विमानतळावर उतरलो तेव्हा प्रसाधनगृहात जाईपर्यंत चड्डी ओली झाल्याची आठवणही गाठी होतीच. उबदार कपड्यांची एकावर एक चार-पाच आवरणे. शिवाय कानटोपी, हातमोजे, पायमोजे अशा बंदोबस्तामुळे अंगातील घाम बाहेर जायला वाव नसतो. दुसरीकडून भरपूर पाणी

पिण्याची सक्ती असते. या पार्श्वभूमीवर निसर्गाच्या त्या हाकेला लगेच प्रतिसाद देणे शहाणपणाचे असते. अशावेळी अनाठायी संकोच बाळगण्याचे कारण नाही हे मी अनुभवाने शिकलो आहे.

व्यंकटेश माडगूळकरांनी एक आठवण लिहून ठेवली आहे. पोलिस मागे लागल्याने एकदा त्यांच्यावर लपून बसण्याची वेळ आली होती. बराच वेळ ते एका घराच्या माळ्यावर बसले होते. त्यातच जोरात लघवीला झाल्यावर काय करावे असा प्रश्न त्यांना पडला. विचारांती त्यांनी अंगातील बनियन काढून त्यावरच तो कार्यभाग उरकून घेतला होता. ऑली उतरताना तो किस्सा आठवला. मनाशी म्हटले जाऊ द्या, अशा प्रसंगांना सामोरे जाणारे आपण काही एकटेच नाही... हा तर सगळ्यांचाच अनुभव! 'माझा प्रवास' या गोडसे भटजींच्या प्रवासवर्णनपर आत्मकथनात अशीच पण अधिक गंभीर स्वरूपाची एक घटना त्यांनी नमूद केली आहे. जिज्ञासूंनी त्यासाठी मूळ पुस्तक वाचावे. प्रवासातील असे फजितीचे किस्से सांगायचे तर त्यावर एक मोठे प्रकरणच होईल.

दीड-पावणेदोनच्या सुमारास घरी आलो. गरम पाण्याने आंघोळ केली. अंग खिळखिळे पण मन तृप्त झाले होते. मस्तपैकी लोळत पडलो. बऱ्याच दिवसात असा निवांतपणा मिळाला नव्हता.आता संध्याकाळचा वेळ रिकामा होता. ऑलीच्या बाजारात एक चक्कर मारावी असे ठरवले.पण अचानक वातावरण बदलायला लागले. झाकोळ पसरला. थंडी वाढू लागली. क्षणातच ढग गडगडू लागले. विजा चमकू लागल्या.सव्वापाच वाजता कडकडाटासह पाऊस सुरू झाला. काय करावे कळेना.
मध्येच लाईट गेली. हॉटेलात बसून राहण्याशिवाय दुसरे काहीच हाती उरले नाही.

रात्री आठ वाजता जेवण. गप्पा. दहा-साडेदहा पर्यंत टीव्हीवर कोणतातरी एक कार्यक्रम बघत बसलो. रात्री वेटरने खोलीत चहाचे साहित्य आणून ठेवले. यतीनही येऊन गेला. त्याने बदललेल्या कार्यक्रमाची माहिती दिली. खराब हवामान आणि ट्राफिकच्या अडचणीमुळे शुक्राचार्य मंदीर पाहण्याचा कार्यक्रम रद्द झाला होता. त्याऐवजी नीती पास करायचे ठरले होते.त्यासाठी थोडा अतिरिक्त खर्च येणार होता. त्यासाठी आम्ही हो म्हटले...अंथरूणात शिरलो. ट्रेकच्या सुंदर थकव्याने शांत झोपचे बक्षीस पदरात टाकले होते.

***

सोमवार उजाडला. हा शंकराचा दिवस. शंकराचा आणि हिमालयाचा फार जवळचा संबंध. हिमालय हे शंकराचे घर. त्याला भेटायला जायचे तर खालून वर जाताना एकेक मोह, आसक्ती सोडत जायचे असते अशी एक दंतकथा आहे. वर अगदी पूर्णपणे विरक्त होऊन त्याचे दर्शन घ्यायचे. मी मनाशी म्हणालो, ही दंतकथा आपल्याला पटो न पटो पण आपण एखाद्या गोष्टीची आसक्ती सोडता येते का याचा विचार करायला काय हरकत आहे? शंकर हे लोकदैवत. त्यामुळे तो तसा अधिक जवळचा वाटतो हेही तितकेच खरे. विचारांची गाडी अध्यात्माच्या दिशेने घरंगळू लागली. तिला थांबवून धरत पुन्हा वर्तमानात आलो.

बाहेर रिमझिम पाऊस पडत होता. आसमंत ढगांनी व्यापून टाकलेला. किर्र ऽऽऽ शांतता. चहा करून घ्यायचा होता पण लाईट नव्हती त्यामुळे पाणी उकळता येत नव्हते. मग खिडकीतून नुसता आकाशाकडे बघत राहिलो. आकाश

ढगांनी व्यापून टाकले होते. इतके ढग होते की आम्ही जणूकाही ढगातच राहत होतो. सकाळी सकाळी हवामान इतके बेभरवशाचे झाले की शुक्राचार्य मंदिराबरोबरच नीती-पासला जाण्याचा कार्यक्रमही रद्द करावा लागला.

सात वाजत आले तरी पाऊस सुरूच होता.लाईट येण्याची शक्यता दिसत नव्हती. मग बाहेर येऊन समोर पहात राहिलो.एका झाडावर एक नर्तक (फ्लायकॅचर) गोड आवाजात गात होता. एक कोकीळ सकाळपासून खालच्या बंगल्याच्या छपरावर पावसात भिजत बसला होता. 'दारी पाऊस पडतो रानी पारवा भिजतो...' हे अशोकजींचे गाणे आठवले. त्या पाठोपाठ तो मनस्वी कवी आणि त्याच्याशी असणारी दोस्तीही आठवली. कालाय तस्मै नमः... थोड्या वेळाने लाईट आली. चहा करून घेतला. गंमत म्हणजे तोवर नळातून कडकडीत गरम पाणी वहायला लागले. मी खूष झालो...

मस्त आंघोळ करून दोघेही तयार झालो. आता थेट बागिनीला निघायचे होते. तिच्या भेटीची ओढ लागली होती. कपड्यांची काळजीपूर्वक निवड केली.थर्मल,स्वेटर, जॅकेट असा त्रिस्तरीय पोशाख करून तयार झालो.पाऊस सुरूच होता. बाहेर तो कोकीळ अजूनही तसाच व्रतस्थपणे भिजत बसला होता. कुणासाठी हे व्रत घेतले असेल त्याने? मी स्वतःशीच हसलो आणि विचारांचा सांधा बदलत हॉटेलच्या प्रवेशद्वाराजवळील लॉबीत आलो. सगळेच आता गाड्यांची वाट बसले होते.पण  दहा वाजत आले तरी गाड्यांचा पत्ता नव्हता. खाली गावात ट्राफिकचा घोळ झाला होता.डोंगर माथ्यावरचा रिसॉर्ट. जेमतेम दोन गाड्या पास होतील एवढा जाण्या-येण्याचा चिंचोळा रस्ता. माणूस करून करून  करणार काय?आमचे टाईम-टेबल कोलमडून पडण्याच्या बेतात होते. नऊ वाजता निघायचे ठरले होते पण दहा वाजले तरी काहीच प्रगती होत नव्हती. थोड्यावेळाने वेळाने पाऊस कमी झाला. ऊन आले. समोरचे दृश्य बदलले. शिखरांवरचे बर्फ चमचमायला लागले. हिरवे, पिवळे,निळे, जांभळे रंग दृग्गोचर होऊ लागले. निसर्गाची ती अद्भूत प्रकाशयोजना पाहून चकित व्हायला झाले. गाड्या येईपर्यंत तो एक चांगला टाईमपास मिळाला.

अखेर गाड्या येऊन पोहोचल्या.निघालो. दोन्ही बाजूंनी उंच उंच गेलेल्या पर्वतरांगांमधून  प्रवास सुरू झाला. देवदारचे उंच उंच वृक्ष,अधून मधून दिसणारे धबधबे,उंच पर्वतशिखरे, खोल दऱ्या, नदीचे प्रवाह असे वातावरण मनावर गारुड करत होते.

रुईंगला पोहोचायला एक वाजला.तेथे टेन्ट उभारणी सुरू होती. दोन वाजले तरी ते काम सुरूच होते. सात-आठ जणांची टीम काम करत होती. कंट्रीसाईडचे स्थानिक टूर लीडर देबू आणि बीपीन. त्यांचे सात मदतनीस, दोन स्वयंपाकी,  ते ११ आणि आम्ही १४ असे मिळून एकूण २५ जणांची टीम. सोबत सामान वाहून नेण्यासाठी सात घोडे... ही चैन नव्हती; तर तिकडची परिस्थिती लक्षात घेता त्या अत्यावश्यक गरजा होत्या. इतक्या उंचावर बर्फाळ भागात राहणार कुठे, खाणार काय, असे अनेक प्रश्न असतात.  छंद तर जोपासायचा आहे मग त्यासाठी अशी व्यवस्था करून देणाऱ्या त्या टूर कंपन्यांचे आभार मानावे तितके थोडे. शिवाय पर्यटन हा हिमालयातील एक मोठा व्यवसाय. त्याच्यावर असंख्य लोकांची उपजीविका अवलंबून असते हेही लक्षात घेतले पाहिजे.

देबू हा उत्साही गडी! तंबू लावणे, काढणे, भाजीपाला, तिखटमीठ खरेदी, स्वयंपाकाची व्यवस्था, घोड्यावरून सामान वाहून नेणे, प्रशासकीय स्वरूपाच्या स्थानिक बाबी आणि शिवाय गाईड म्हणून काम करणे. ही सर्व कामे त्याच्या नेतृत्वाखाली होत होती. बुटक्या चणीचा, हनुवटीवर दाढी राखलेला, मजबूत बांध्याचा पण अतिशय चपळ देबू. त्याने आपल्या व्यक्तिमत्वाने सगळ्यांवरच छाप टाकली होती. सदैव आनंदी आणि हसतमुख प्राणी. कधीही त्याने आपल्या सहकाऱ्यांवर बॉसिंग केल्याचे दिसले नाही. उलट कुणाचीही वाट न बघता पडेल ते काम हाती घेऊन तडीस लावणे हा त्याचा स्वभाव. त्याच्या पाठीवरची बॅग जवळपास २० ते २५ किलो वजनाची सहज असेल. स्टीलच्या छोट्या मगापासून गरजेच्या वेळी खडतर चढणीवर लावण्याच्या दोरखंडापर्यंत सगळ्या गोष्टी त्या पिशवीत अतिशय शिस्तीने बसवलेल्या असायच्या. जणू त्याचा सारा संसार, सारे आयुष्य त्या बॅगेमध्ये सामावलेले आहे! बॅग पाठीवर घेऊन तो निघाला की आम्ही सारे मंतरल्यागत त्याच्यामागून चालायला लागायचो. त्याच्या नेतृत्वाची आणि हरहुन्नरी स्वभावाची हळूहळू चांगली  ओळख होत गेली. मला तर हळूहळू देबूच्या जागी देरसू उझाला हे 'कॅरेक्टर' दिसू लागले. निरोपाच्या वेळी मी तसे उघडपणे बोलून दाखवले. ते ऐकून देबू खूश झाला आणि म्हणाला, आजसे मै आपका देरसु उझाला!

देरसु उझाला ही रशियन लेखक ब्लादिमीर अर्सेनिव्ह लिखित जगप्रसिद्ध कादंबरी.पुण्याचे जयंत कुलकर्णी यांनी तिचा मराठी अनुवाद केला आहे. 'राजहंस'तर्फे तो प्रसिद्ध झाला आहे. अर्सेनिव्ह यांच्या सर्वेक्षण पथकाला जंगल झाडीतून मार्ग दाखवायचे हे काम देरसुचे काम. ते त्याने नेटाने पार पाडलेच पण अनेकदा या टीममधील साऱ्यांचे प्राणही वाचवले.अडाणी जंगली माणूस. पण प्रचंड बुद्धिमत्ता असणारा. देरसू निसर्गाशी एकरूप झालेला आहे. १९०२ ते १९०७ या कालखंडात त्याने या पथकासाठी वाटाड्याचे काम केले. जंगल म्हणजे काय हे तर त्यांना शिकवलेच पण प्रसंगी त्यांचा जीवही वाचवला. देरसूच्या कहाणीवर आधारित अकिरा कुरासावा यांनी त्याच नावाचा चित्रपट काढला असून ऑस्करसह अनेक पारितोषिकांनी त्याला सन्मानित करण्यात आले आहे...

पक्षी-प्राणी, झाडेझुडपे या साऱ्यांचा उल्लेख देबू 'माणूस' म्हणून करायचा,ही गोष्ट मला खूप विलक्षण वाटली. प्रत्येक सजीवाला तो जणू माणूसपणाचा दर्जा देत होता. सर्व सजीवांनी परस्परांचा सन्मान करत एकाच पातळीवर जगत राहावे असा जणू संदेश देत होता.जंगलभ्रमंतीची, पक्षी निरीक्षणाची आवड असणाऱ्या माझ्यासारख्या माणसाच्या मनात देरसूने कायमची वस्ती करावी यात आश्चर्य ते काय!

आम्ही कॅम्पच्या ठिकाणी गेल्यावर एकीकडे किचनचा तंबू आणि दुसरीकडे मुख्य बैठकीचा तंबू लागणे सुरू व्हायचे. हळूहळू सगळी मंडळी जमली की बाहेर खुर्च्या टाकून आराम करीत बसत. तोवर किचन-टेन्टमध्ये चहा-कॉफी, सूप असे तयार झालेले असे. ते समोर आले की सारे त्यावर तुटून पडत.

रुईंग येथे आम्ही सुमारे आठ हजार फूट उंचीवर होतो. इथवरचा आमचा प्रवास वाहनाने झाला होता. पण यापुढे पायी चालायचे होते.चढत चढत वर जायचे होते. थोडे थोडके नव्हे तर जवळपास आठ हजार फुटांचा चढ चढून पंधरा हजार फुटांची उंची गाठायची होती. रोज किमान पाच-सहा किलोमीटर चालावे लागणार होते. आणि चढ म्हणजे अगदी रमत-गमत सावकाश वर वर जायचे नव्हते तर अवघड डोंगर, वळणे, उभे-आडवे चढ, दऱ्या,

नद्यानाले पार करत, वारा वादळे पाऊस ऊन अंगावर झेलत, जेथे नीट वाट नाही, अशा ठिकाणी वाट तयार करत; प्रसंगी दोर लावून त्या आधाराने वर जायचे होते.

चार वाजता जेवण झाले. अशा ठिकाणचा कॅम्प हा एक रोमँटिक अनुभव असतो. सूप,ऑम्ले-टब्रेडपासून वरणभातापर्यंत आणि पापड-लोणच्यापासून आईस्क्रीमपर्यंत सारे पदार्थ टेबलावर हजर असतात. 'कंट्रीसाईड' ही त्यासाठी नावाजलेली कंपनी.
जेवण-खावणाबाबत म्हणाल तर घरापेक्षाही या टूरवरची व्यवस्था अधिक परिपूर्ण आणि पौष्टिक असते हे सांगावेच लागेल.

जेवण झाल्यावर रूईंग गाव फिरुन आलो.अगदी छोटेसे गाव. छोटी पायवाट. छोटी घरे. आनंदी हसऱ्या चेहऱ्याची माणसे. डोंगर उतारावर एका झाडाच्या खाली बांधलेले घोडे. ते आमचे सामान वाहून नेणार होते... पाय मोकळे झाले. उद्यापासून चढाईला सुरुवात. म्हणजे परीक्षेला बसायचे. रोज एक पेपर द्यायचा. मी मनात कल्पनांचे अनेक इमले बांधत होतो.

कॅम्पवर परत येताना पाऊस सुरू झाला. चांगले भिजायला झाले. अंधार होऊ लागला होता.सव्वापाच वाजता टेंटमध्ये शिरलो. टेन्टच्या कापडावर पावसाची टप् टप् सुरू झाली. ती टप् टप् नीट लक्ष देऊन ऐकू लागलो... मुंबई ते डेहराडून, डेहराडून ते ऑली,ऑली ते रुईंग असा सगळा प्रवास नजरेसमोरून सरकू लागला.

प्रयागांच्या ठिकाणचे नद्यांचे संगम समोर आले आणि जणू माझ्या आठवणींतून वाहू लागले...आपल्या शरीरातही इडा, पिंगला आणि सुषुम्ना या तीन नाड्या असतात. त्याही एका अर्थी नद्याच. त्यांनाही गंगा, यमुना आणि सरस्वतीच्या रूपात उल्लेखिले जाते. देवप्रयाग येथे अलकनंदा आणि भागीरथीचा संगम पाहताना मी देहभान हरपून गेलो होतो. वाटत होते की खाली उतरावे आणि संगमावर मनसोक्त फिरावे. तेथील पाण्यात डुंबण्याचा आनंद घ्यावा. पण वेळेअभावी ते शक्य झाले नव्हते. रुद्रप्रयाग येथील अलकनंदा आणि पिंडारी, नंदप्रयाग येथील अलकनंदा आणि नंदाकिनीचा, कर्णप्रयाग येथील अलकनंदा आणि मंदाकिनी तर विष्णूप्रयाग येथील अलकनंदा आणि धौलीगंगा या नद्यांच्या संगम-क्षेत्रातून फिरताना का कुणास ठाऊक पण खूप प्रसन्न, पवित्र वाटत होते.

नद्यांच्या काठी माणसांच्या संस्कृत्या वसल्या,वाढल्या. बहराला आल्या. नद्यांनी केलेले उत्पात, विध्वंस, संहारही माणसाच्या वाट्याला आले. अगदी ताजे उदाहरण म्हणून याच भागातील 'तपोवन विद्युत प्रकल्पा'चे काही मिनिटातच उध्वस्त झालेले ठिकाणही नजरेसमोर आले. अख्ख्या डोंगरापासून तोडून नेलेला तो लचका आणि त्याखाली उघडा पडलेला तो भेसूर भाग नजरेसमोर येऊन उभा राहिला... पाच मिनिटात होत्याचे नव्हते झाले. किती माणसे मेली त्याचा हिशेबही लागला नाही. अजूनही अधूनमधून तिकडे मृतांचे देह आढळून येतात असे स्थानिक लोक सांगतात... केदारनाथच्या प्रलयाचे उदाहरणही ताजेच होते. त्याआधी फार पूर्वी अमरनाथकडील एका मोठ्या भूस्खलनात प्रोतिमा बेदी ही कलासक्त नर्तकी आणि तिच्याबरोबर इतर अनेक लोक हिमालयाच्या पोटात कायमचे गडप झाल्याचेही आठवले. निसर्गाने आपला वरवंटा फिरवला की तो कोणालाच दयामाया दाखवत नाही. राजा

आणि रंक सगळे त्याच्यासाठी सारखे. अशा घटना दरवर्षी घडत राहतात आणि त्यात किती लोक गेले याच्या याद्या पुढे जाहीर होत राहतात... हळूहळू त्या आठवणीसुद्धा काळाच्या उदरात गडप होऊन जातात. माणूस आपल्या चुका सुधारत नाही त्याचे येरे माझ्या मागल्या सुरूच राहते.

तंबूतल्या तंबूत मी चुळबुळत होतो. मनात विचारांनी गर्दी केली होती.उत्तरेकडील सर्वच राज्यांत फार वेगाने शहरीकरण चालू आहे. डोंगरउतारावर मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असून जागोजागी सिमेंट काँक्रिटचे प्राबल्य दिसू लागले आहे. थोड्याथोड्या अंतरावर हॉटेले, रिसॉर्ट्स दिसू लागली आहेत. आणखी वर जावे तर स्थानिकांना ज्याचा अजिबात उपयोग नाही असे जलविद्युत प्रकल्प उभारले जाताना दिसत आहेत. नद्या अडवल्या जात आहेत, त्यांचे प्रवाह बदलले जात आहेत. धरणे,पूल,
भुयारीमार्ग, रोप-वे, अन्य विविध कारणांसाठी बोगदे खणणे अशी कामे वाढलेली दिसत आहेत.निसर्गाच्या रचनेत अशी ढवळाढवळ होत असल्याने पावसाचे टाईम-टेबल बदलत आहे. हिमनद्या मागेमागे सरकत आहेत. बागिनी हे त्याचे एक उदाहरण आहे याची तोवर मला कल्पना आली नव्हती. ढगफुटी, भूस्खलन, हिमकडे कोसळणे अशा नैसर्गिक संकटात हजारो माणसांचे नाहक बळी जात आहेत. यातून माणूस काही शिकणार आहे की नाही?

माणसाने निसर्गाप्रती कृतज्ञ राहायला पाहिजे,त्याच्याशी स्पर्धा न करता उलट जुळवून घेत जगत राहिले पाहिजे. हे ज्ञान सर्वांनाच आहे पण बऱ्याचदा ते सुभाषितांच्या पातळीवर राहते. निसर्गाच्या योजनेत आपण हस्तक्षेप करत आहोत हे माणसाच्या लक्षात येत नाही. लक्षात आले तरी तो ते गांभीर्याने घेत नाही.का? म्हटलं जाऊ दे. 'आज इथं तर उद्या तिथं' या मालिकेतील रुईंगच्या या अफलातून  मुक्कामाचा अन्वयार्थ लावता लावता झोपेच्या आधीन कधी झालो ते कळलेच नाही.

***

भल्या पहाटे एक कावळा बाहेर गोड आवाजात काव काव करत होता. तो जणू आम्हाला उठवायला आला होता, हाका मारत होता. मी बाहेर आलो. काळा कुळकुळीत ढब्बू कावळा. पण आवाज मात्र अगदी खडीसाखरेसारखा गोड. हिमालयातले सगळे कावळे गोड आवाजातच कावकाव करतात असा माझा अनुभव.

वाहणाऱ्या नदीचा आवाज सोडला तर आजूबाजूला कमालीची शांतता होती. दिशा उजळत होत्या. वर अथांग आकाश. ढगांची दुलई पांघरून साखरझोपेत बुडालेली शिखरे. गवतावर आणि आजूबाजूच्या झुडपांवर पडलेले ताजे दव. निसर्गाचा चिंब थंड पहाट-सोहळा. हळूहळू कॅम्पला जाग येऊ लागली. एकेकजण बाहेर येऊ लागला. घडीच्या छोट्या छोट्या खुर्च्या बाहेर टाकून मंडळी बसली. शहरी गजबाजाटापासून दूर निवांतपणातील खुमारी अनुभवू लागली.

हातपाय,तोंड धुण्यासाठी प्लास्टिकच्या छोट्या टबमधून गरम पाणी आले.नंतर चहा. अंघोळीचा प्रश्नच नव्हता. मग बाकीचे सगळे सोपस्कार आटोपणे, कपडे घालणे, बॅगा भरणे यासारखी कामे आटोपून मंडळी तयार झाली. बाहेर

उन्हातच टेबल-खुर्च्या लावून नाश्ता झाला. एकीकडून सहाय्यकानी टेंट काढण्याचे काम सुरू केले. घोडे जागच्याजागी फुरफुरत होते. पुढील कॅम्पवर जाण्यासाठी तेही उत्सुक होते.

नी- कॅप, थर्मल,स्वेटर, कानटोपी, बूट, काठ्या, पाच-सहा किलो वजनाची सॅक. दोन-दोन लिटरच्या पाण्याच्या बाटल्या. अशा तयारीसह सर्वांनी हळूहळू वर चढायला सुरुवात केली. गाव सोडताना डोंगराच्या कडेला एका चिंचोळ्या जागी वाहने लावण्याची शेवटची जागा.तेथून पुढे आता शहरीकरणाच्या कोणत्याही खुणा दिसणार नव्हत्या. मोबाईलचे नेटवर्कही राहणार नव्हते. मजल-दरमजल करत सर्वजण वरच्या दिशेने चालू लागले. आता फक्त झाडे, डोंगर-दऱ्या, आकाश यांचे सानिध्य होते.

पावसाने दोस्तीचा हात पुढे केला होता. उजवीकडे डोंगर. त्यातील चिंचोळी वाट धरून आम्ही चाललो होतो. डावीकडे खाली दरी. तिच्या किनाऱ्याला अंगावर एकही झाड किंवा कोणतीही वनस्पती नसणारा उंच  डोंगर निर्विकारपणे उभा. त्याचे बेलाग सुळके आकाशात घुसलेले. त्या सुळक्यांना साक्षी ठेवून वर वर निघालो. हळूहळू त्याच्या माथ्याशी समांतर पल्ला गाठून झाला. तेथून त्याची टाळू पाहून होते न होते तोवर दुसऱ्या पर्वतरांगेत शिरावे लागले. तो बोडका डोंगर मागे पडला. दिसेनासा झाला. आता समोरचे दुसरे शिखर पार करून जायचे होते. पुढचा सारा प्रवास असाच होणार होता. एक चिमणी आली एक दाणा घेऊन गेली त्या चालीवर एक डोंगर आला तो मागे पडला. दुसरा डोंगर आला तो मागे पडला...

वाटा चिंचोळ्या, निसरड्या. कधी सरळ वर जाणाऱ्या. कधी वर-खाली होणाऱ्या. कधी आडव्या आडव्या वळत जाणाऱ्या तर कधी नागमोडी! एकादी वाट कधी डोंगरकपारीतून खणून काढलेली,काळजाचा ठोका चुकवणारी...अधूनमधून मोठमोठे दगड.कातळकडे. त्यांना धरत धरत,त्यावरून उड्या मारत, बसत उठत, कसरती करत करत पुढे सरकणे. अधूनमधून विश्रांती. पाणी. चॉकलेट. सुकामेवा. त्याचे आदान-प्रदान.गप्पा. जुन्या सहलींच्या आठवणी. आजूबाजूच्या पाना-फुलांवर नजर टाकणे, फोटो काढणे, पुन्हा मार्गस्थ होणे असे सुरू. शरीराची आणि मनाची परीक्षा घेणारा प्रवास. काही क्षण असे यायचे की 'आता नकोच' असे वाटायचे पण पुढचे पाऊल आपोआप उचलले जायचे. परतीचे दोर आता कापून टाकले आहेत हा संदेश मनाने जणू स्वीकारला होता.

मध्येच एक प्रचंड मोठी दरी लागली. ती ओलांडून पलीकडे जायचे होते. खाली उतरून पुन्हा वर चढणे हा एक मार्ग होता आणि दुसरा डोंगराच्या उंच किनारधारेनेच हळूहळू सरकत पलीकडे जाण्याचा. आम्हाला त्या वरच्या वाटेने जायचे होते. अतिशय धोकादायक आणि थरारक असा तो मार्ग.  त्या मार्गावरील सर्वोच्च भागात एका ठिकाणी वीस पंचवीस फूट लांबीचा एक दोर बांधलेला होता. तो धरून एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे जायचे होते. दोन्ही टोकांपाशी आणि मधोमध देबू आणि त्याचे सहाय्यक आधार देण्यासाठी उभे होते.ते एकेकाला हाताला धरून हळूहळू पलीकडे घेऊन जात होते. असे करत करत आम्ही सगळेजण दुसऱ्या टोकाला पोहोचलो.

खाली पाहिले की काळजाचा ठोका चुकायचा. पाय सटकला की कपाळमोक्ष.पण तसे काही विपरित घडले नाही. दुसऱ्या बाजूला पोहोचल्यावर सगळ्यांनी सुटकेचा निश्वास टाकला. वाटले सुटलो. पण त्यानंतर वरचा आणखी एक

गवताळ टापू पार करायचा होता. त्यावर वाट जवळपास नव्हतीच. सर्वत्र कंबरभर वाढलेले गवत.ते झोडपत वाट शोधायची आणि मग वर जायचे. असे करत करत हळूहळू उठत-बसत, थांबत थांबत वर निघालो. कधी कधी सहाय्यक मालाचे पोते चढवावे तसे दोन्ही बाजूंनी बखोटे धरून एकेकाला वरच्या अंगाला चढवत असत. कशाला झक मारली आणि इकडे आलो असा विचार क्षणभर मनात यायचा. पण दोन पावले आणखी पलीकडे गेलो की पुन्हा तरतरी यायची. छान वाटायचे. उद्दिष्ट पूर्ण करेपर्यंत थांबायचे नाही असा निर्धार पुन्हा मनाशी व्हायचा. मनाची हीच तर खासियत आहे. आमच्या ग्रुपमध्ये चार महिला होत्या पण त्यांनी कधीही धीर सोडला नाही. हिम्मत हारली नाही. द्रोणागिरीला वर पोहोचलो तेव्हा कळले की वंदना यांनी नुकताच केमोथेरपीचा गड पार केलेला आहे. मग तर त्यांच्याविषयी खूप कौतुक वाटले.आदर वाढला. प्रेरणाही मिळाली.

अखेर माथ्यावर पोहोचलो. आता वर सपाटीचा भाग होता. थोडे उतरते आणि लांबरुंद पसरलेले गवताळ कुरण. वाटेत वाहणारे ओहोळ. ते ओलांडून उड्या मारत मारत पुढे आल्यावर छोटेसे मैदान लागले. त्याच्याखाली कडेला दिसणारी ती खोल दरी आणि वर द्रोणागिरी गाव. आम्ही कॅम्पचे ठिकाण गाठले होते. तोवर दरीतील खालच्या दुसऱ्या वाटेने घोडे आधीच तेथे येऊन पोहोचले होते. तंबू लावण्याचे काम सुरूही झाले होते. ओल्या गवताळ टापूवर घोडे मजेने फिरत होते. त्यांचे खिंकाळणे हे आमच्या येथवरच्या शौर्याचे जणू पार्श्वसंगीत वाटत होते...

मुक्कामाचे ठिकाण दिसल्यामुळे सारेच हुशारले. एकीकडे चहापानाची तर दुसरीकडे तंबू उभारण्याची तयारी सुरू झाली. तिसरीकडे आम्ही फोल्डिंगच्या खुर्च्या टाकून गप्पा करत बसलो.महेशभाईंनी शीर्षासन करून आणि इतरांनीही या ना त्या प्रकारे आपल्या फिटनेसचे दर्शन घडवले. अभी आणि जितेंद्र आपले कॅमेरे सरसावून उत्तमोत्तम कोनातून छायाचित्रे काढण्यासाठी आजूबाजूला मोक्याची ठिकाणे गाठू लागले.

मी दरीच्या बाजूला काठावर येऊन उभा राहिलो आणि खाली पाहू लागलो. काळजाचा ठोका चुकवणारी आणि कोणत्याही क्षणी कोसळेल अशी ठिसूळ दगड-मातीची ती दरी. थोडी जरी धसली तरी आम्ही कुठे गायब झालो हे जगाला कधीच कळले नसते इतकी खोल. तंबूतील ती रात्र फार अस्वस्थ गेली कारण कोणत्याही क्षणी दरी ढासळेल आणि आपण धरणीच्या पोटात गडप होऊन जाऊ असे वाटत राहिले. मध्यरात्री जागा झालो. बाहेर येऊन पाहिले. समोर ती महाप्रचंड दरी. मागे गगनचुंबी पर्वतशिखरे. वर अथांग आकाश आणि त्यात उमललेल्या लक्षावधी चांदण्या. चांदण्यांनी भरलेले आकाश पाहून खूप छान वाटले. निसर्गाने जणू मुक्तहस्ताने आपल्या सौंदर्याचा खजिना उघडला होता. दोस्तीचा हात माझ्या पाठीवर ठेवून मला पुढच्या प्रवासासाठी प्रोत्साहित करीत होता. मग मी समाधानाने आत गेलो आणि झोपेच्या आधीन झालो.

***

दुसऱ्या दिवशी सकाळी निघालो. द्रोणागिरी गावाला लगटूनच वर जाण्याचा रस्ता. उजव्या हाताला द्रोणागिरी पर्वत.तो खालून घनदाट वृक्षराजींनी भरलेला पण वरचा मानेकडचा जवळपास तीस टक्के भाग पूर्ण तुळतुळीत, वृक्षविरहित. एखाद्या केकचा वरचा तुकडा कापून बाजूला ठेवावा आणि मागील ती मोकळी जागा स्वच्छ, सुंदर

मोकळी दिसावी तसा! संजीवनी वनस्पतीसाठी तेवढा भाग हनुमानाने काढून लंकेत नेला अशी दंतकथा. नजरेसमोर असणारा डोंगराचा तो भाग त्या दंतकथेशी तार्किक स्वरूपाचे नाते सांगत होता. या दंतकथेच्या अनुषंगाने गावकऱ्यांशी बोलायचे नाही अशी सूचना यतीनने केली होती. त्यासंबंधीचे प्रश्न शंकेखोर वृत्तीने विचारल्यास गावकऱ्यांच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात; त्या अनुषंगाने काळजी घेणे आवश्यक होते. तिकडे हनुमानाची पूजा केली जात नाही हेही अर्थात ओघाने आलेच.

गावकरी आमच्याकडे कुतूहलाने बघत होते. प्रोत्साहित करीत होते. सावकाश जा. खूप लांबचा रस्ता आहे असे बाया-बापड्या सांगत होत्या. त्यांच्या नजरेत आमच्या या यात्रेविषयीचे कौतुक होते, आदर होता. त्यांच्या डोळ्यांतील ते कौतुक झेलत आम्ही मार्गस्थ झालो. गावाला लागून असणारा मोठा डोंगर पार केला. एक डोंगर पार केला की सुटलो असे वाटायचे पण माथ्यावर पोहोचले की दुसरा नवा डोंगर समोरच उभा असायचा. असे एकामागून एक मोठमोठे डोंगर उभे-आडवे पार करत, एकमेकाला आधार देत, एकमेकांच्या मदतीने आम्ही पुढे पुढे सरकत होतो. सकाळी थंडी, दुपारी ऊन अशा विषम हवामानाशी जुळवून घेत निर्धाराने पुढे चालत होतो.

मध्ये बागिनी-नाला आणि गरुड-ब्रिज पार करावा लागला. तेथे थोडी विश्रांती झाली. नदीपात्रात आणि काठावर मोठमोठे आदिम शीलाखंड.आम्हाला नजरकैदेत ठेवल्याप्रमाणे सभोवती वर गेलेली उंच उंच शिखरे. स्वच्छ निळे आकाश. त्यात तरंगणारे विविध आकारांचे शुभ्र ढग आणि या साऱ्याच्या पार्श्वभूमीवर पाण्याच्या खळखळाटाचे गंभीर संगीत. एकूणच त्या प्रवासाला एक आगळी भव्यता होती. गांभीर्य होते. दरम्यान मागून एका लयीत तबडक, तबडक करत घोडे आले आणि पाठीवरील ओझी नेटाने सांभाळत पुढे निघून गेले. घोडे आले की आम्हाला वाट सोडून बाजूला थांबावे लागायचे. कारण इतक्या उंचावर आणि अवघड जागी त्यांची गती आणि लय खंडित करणे धोक्याचे असायचे. घोडे निघून गेले की पुन्हा आम्ही आमची वाट पकडायचो. आमची मजल-दरमजल पुन्हा सुरू व्हायची.

एका ठिकाणी लव्हाळीच्या बेटाला लागून असणाऱ्या नितळ,निर्मळ पाण्याच्या बाजूला एका मोकळ्या, रम्य जागी बसून अल्पोपाहार झाला. पुन्हा तासाभराच्या रपेटीनंतर 'लांगाटोली कॅम्पसाईट'वर येऊन पोहोचलो. विस्मयचकित करून टाकणारे नदीचे विस्तीर्ण खोरे. पात्रातच आमचा कॅम्प पडला.एका बाजूला एक छोटे पक्के घर. कॅम्पसाइटवर येणाऱ्या लोकांसाठी सामानसुमान ठेवायला आणि स्वयंपाकासाठी भरवशाची जागा!

आता ऊन थोडे उतरले होते त्यामुळे छान वाटत होते. सगळे नदीकडे धावले.आम्हीही नदीत उतरलो. हातपाय धुतले. किनाऱ्यावर विसावलो. नदीचा तो अद्भुत नजारा डोळ्यात साठवून घेण्याचा प्रयत्न करू लागलो. भारतात कोठेही नदीवर पोहोचलो की मला पोलादपूर आणि तेथील आमच्या सावित्री नदीची हटकून आठवण येते. त्या आठवणीतून बाहेर पडत पुन्हा वर आलो. पाणवनस्पती आणि लव्हाळी यांनी युक्त जमिनीचा एक छोटा, मोकळा उंचवटा. त्यावर मुख्य टेन्ट. बाजूला खडकाचा आधार घेऊन उभारलेले अन्य टेंट. बाहेर खुर्च्या टाकून बसता येईल अशी जागा.

आजूबाजूला गाई-बैल चरत होते.त्यांच्या गळ्यातील घंटांचा आवाज येत होता. आपली गुरे कुठे आहेत हे त्यामुळे लगेच गुराख्यांच्या लक्षात येते.वन्य प्राण्यांनी लांब राहावे म्हणूनही त्या आवाजाचा उपयोग होतो. हळूहळू संध्याकाळ झाली. थंडीचा कडाका वाढू लागला. जेवण लवकरच आटपले. 'टेन्ट लॅम्प'चा विजेरीसारखा वापर करत वाट काढून आम्ही तंबूत शिरलो.

झोप येईना.तंबूवर पाण्याचे थेंब टपटपत होते.जर मोठा पाऊस आला आणि नदीला पूर आला तर त्यात आपण वाहून जाणार, असाही विचार मनात आला.मनात विचारांचे विविध तरंग उमटत होते.आमच्या तंबूकडे मी निरखून पाहू लागलो. जेमतेम पाच बाय सात फुटांचा  तंबू. त्याच्या संरक्षणार्थ बाहेर उभारलेला आकाराने थोडा मोठा तंबू. मोठा पाऊस आला, वादळ झाले आणि त्यात वरील तंबू उडून गेला तरी आतील सुरक्षित राहू शकतो. आतील तंबूच्या तळाला प्लास्टिकची वॉटरप्रूफ जाड चटई. त्यामुळे बाहेरील ओल, बर्फ, माती यापासून आपण सुरक्षित राहतो.

हातपाय लांब केले की ते तंबूच्या कापडी भिंतींना लागायचे. वर उठायचा प्रयत्न केला तर डोके छताला लागायचे. कपडे घालताना धड उभे राहता यायचे नाही की बसता यायचे नाही. अंगावर कपड्यांचे तीन-तीन थर असल्यामुळे आणखीच अडचण व्हायची. दिवसभर घातलेली गुडघा-टोपी (नी-कॅप) रात्री काढायची असे, कारण ती खूप टोचत असायची. पण ती काढायला जावे तर आधी अंगावरचे सगळे कपडे काढणे भाग असायचे. थंडीमुळे ते शक्य नसे. धड उभे राहता येत नाही की बसता येत नाही अशी स्थिती. त्यामुळे कसरत व्हायची. कधी कधी तो नाद तसाच सोडून द्यावा लागे. पायाशी दोन मोठ्या डफल बॅगा. उशापाशी दोन पाठ-पिशव्या. दोन्ही बाजूला जागा मिळेल तिथे रेनकोट, पाण्याच्या बाटल्या, खाऊच्या पिशव्या,हातमोजे, शाली, कानटोप्या, सरबताच्या बाटल्या, फळे-बिस्किटांचे पुडे, मोबाईल, पावरबँक, हेड लॅम्प असा सर्व संसार. आतील आणि बाहेरील तंबूच्या मधल्या जागेत बूट, काठ्या...स्लीपर, सँडल!

बॅगेतून एखादी गोष्ट काढायची तर पूर्ण बॅग उघडावी लागे. इकडून तिकडे, तिकडून इकडे फिरवावी लागे. थंडी इतकी जबरदस्त की कोणती वस्तू कुठे ठेवली आहे ते आठवणेही मुश्किल व्हायचे. रेखाने माझ्याकडे किंवा मी तिच्याकडे काही मागितले तर  संकट कोसळल्यासारखे वाटायचे, भांडण होण्याची वेळ यायची. 'नकोच ते काही, आहे तसे राहू' असा तह करून आम्ही पडून राहाणे पसंत करायचो.

आजूबाजूचा पसारा जितका कमी असेल तितके आपण सुखी होऊ शकतो असा एक धडा या तंबू-मुक्कामातून मिळाला. कमीतकमी जागा, जास्तीत जास्त आराम. कमीत कमी वस्तू जास्तीत जास्त सुख. वातावरणाशी जुळवून घेताना आणि वेगवेगळ्या परीक्षांना सामोरे जाताना जगण्याचा एक नवाचा अर्थ लक्षात येत होता.एक उदाहरण सांगायचे तर प्रत्येक कॅम्पवर टॉयलेट टेंट लागलेले असायचे पण अनेकांनी प्रातर्विधीसाठी निसर्गाच्या सानिध्यात जाणे पसंत केले होते... बकाल शहरी राहणीमानाच्या सवयीचा हा नॉशिया असणार हे नक्की!

रात्री अडीच वाजता जाग आली. उठून बाहेर आलो. वर  ताऱ्यांनी खच्चून भरलेले आकाश. अंतर इतके कमी की ते अगदी हाताशी आले आहे असे वाटले. धुळीचा एकही कण नसलेली अल्हाददायक,स्वच्छ हवा. लख्ख ताऱ्यांनी चमचमणारे आकाश. सोनेरी-चंदेरी प्रकाशाने नाहून निघालेला परिसर. घनगंभीर आवाज करत वाहणारी नदी. मनावर गारुड झाले.कॅम्प पूर्णपणे निद्रिस्त झालेला.दूरवर चरणाऱ्या गुरांच्या गळ्यातील घंटांचा आवाज शांततेच्या मुलायम शालूला जणू सोन्याची जर लावत होता. पुन्हा टेन्टमध्ये गेलो.पण झोप येईना. रेखा शांतपणे झोपली होती.'टेन्ट-लॅम्प'च्या मंद फिकट प्रकाशात तिच्याकडे निरखून पाहिले. कुठे तिचे अमळनेर, कुठे माझे पोलादपूर आणि कुठे उत्तराखंडातील बागिनी ग्लेशियर्स...जगण्याच्या धावपळीत,सदतीस अडतीस वर्षांच्या संसारात किती दूर आलो होतो आम्ही! माझ्यासोबतच्या खडतर संसारातील सारे श्रम,कष्ट, हाल-अपेष्टा, निराशा, वैफल्य, जवळच्या माणसांकडून केलेल्या फसवणुकीचे क्षण, मानापमानाचे दुःख, संसारातील सारे व्याप-ताप मनाच्या तळाशी गाडून हाती आले तेवढ्या आनंदाच्या क्षणांची स्मृती चेहऱ्यावर मंद स्मिताच्या सायीसारखी वागवत ती शांतपणे झोपी गेली होती. माझ्या चित्तवृत्ती एकदम उचंबळून आल्या. इतक्या वर्षात अशा तऱ्हेने तिच्याकडे  पाहायला कधी वेळीसुद्धा मिळाला नव्हता. मनात विचार आला आपण हिला काय दिले? तिची कधी काही हौसमौज केल्याचेही आठवत नव्हते. मी मुळात कधी रोमँटिक प्रकृतीचा माणूस नव्हतो. सिनेमॅटिक, फिल्मी होणे मला कधी रुचले नाही, जमले नाही. साडी घेऊन देणे किंवा केसात गजरा माळणे असले प्रकार मी कधी केले नाहीत. उलट कायम कोरडा, कडू, नॉन-एक्सप्रेसिव्ह राहिलो. लग्नसुद्धा अर्ध्या दिवसाची किरकोळ रजा घेऊन नोंदणी पद्धतीने केले. खरे तर तिला माझ्यापेक्षा चांगली बँकेतील नोकरी. पण माझी बदली झाली की लगेच दुसऱ्या दिवशी रजेचा अर्ज टाकून नव्या ठिकाणी, नव्या उत्साहाने संसार मांडायला ती पुढे असायची.दोन मुलांना सांभाळत चूल पेटवून गरम भाकरी करून खाऊ घालायची. आमच्या एकूणच प्रापंचिक आघाडीवरील माझ्या बेफिकीर वागणुकीमुळे मी तिची अनेकदा फरफट केली... पण ते सगळे व्यापताप नेटाने इतिहासजमा करून आमच्या संसाराची गाडी चालू वर्तमान काळात सुरू ठेवण्याची तिने कायम काळजी घेतली. हे सारे आठवून मला एकदम भरून आले... काय करावे कळेना. थँक्यू हा शब्दसुद्धा किती कुचकामी आहे हेही  लक्षात आले...मात्र ती जाणीव मला पिसासारखे हलके करून गेली.

***

सकाळ झाली.बाहेर आलो.आजूबाजूला नदीचे विस्तीर्ण पात्र. तिच्या वाहत्या पाण्याचा धीरगंभीर आवाज. वर अथांग निळे आकाश. पूर्वेच्या क्षितिजापाशी ढगांची गर्दी. त्यातून गाळून खाली येणारे विविधरंगी प्रकाशकिरण. हवेच्या शीतल झुळुका. स्वप्नात आहोत की काय असे क्षणभर वाटले.थोड्या वेळाने तोंड धुण्यासाठी छोट्या छोट्या टबमधून गरम पाणी आले. पुढच्या सगळ्या गोष्टी ठरल्याप्रमाणे शिस्तीत पार पडल्या. अभी आणि जितेंद्र बाजूला एका उंचवट्यावर बसून फोटोग्राफी करण्यात गुंतले. क्षितिजापाशी ढग आणि सूर्यकिरण यांच्यात जणू लपाछपीचा खेळ सुरू होता. अशा घडामोडींचे क्षण कॅमेऱ्यात कैद करताना जितेंद्र नेहमी म्हणायचा, 'उधर बहुत बडा ड्रामा चल रहा है.' मला त्याचे हे वाक्य खूप आवडायचे. कारण खरोखर निसर्गात क्षणोक्षणी वेगवेगळ्या घटना-प्रसंगाचे महानाट्य सुरू असायचे.

चहापान आटपून सारे 'गरुड बेस-कॅम्प'च्या दिशेने रवाना झालो. ही रोजची भटकंती आता जणू सवयीचा भाग झाली होती. आज पुढे काय वाढून ठेवले आहे याची नेमकी कल्पना नव्हती. पण 'खडतर परिश्रमास पर्याय नाही'

याचा अंदाज आला होता. यतीन म्हणाला 'आता पुढे खडी चढण नाही, फक्त नदीतून वर वर चालत जायचे आहे'. हे ऐकून हायसे वाटले. पण प्रत्यक्ष प्रवासाला सुरुवात केली तेव्हा  छोटी-मोठी टेकाडे, उभे आडवे भूभाग पार करत आम्हाला वर जावे लागत होते. प्रत्येक टप्पा नवनवे आव्हान उभे करीत होता. अनेक ठिकाणी रस्ता असा नव्हताच. नीट जागा शोधून तेथे पाऊल ठेवायचे आणि मग पुढचे पाऊल उचलायचे. या पद्धतीने सहासात तास चालावे लागणार आहे याची आधी नीट कल्पना आली नव्हती.

चालताना मी आणि रेखा एकमेकांच्या काळजीपोटी सर्वांत शेवटी आणि यतीन आमच्या काळजीपोटी आमच्या मागे असायचा. त्याच्याशी माझ्या अधूनमधून गप्पा सुरू असायच्या. अशा ठिकाणी बडबड न करता शांत राहणे शहाणपणाचे असते पण माझ्यातील ऊर्जा मला स्वस्थ बसू देत नसे.

नदीच्या दोन्ही अंगांनी आणि पात्रात सर्वत्र लहानमोठे दगड-गोटे, खडी, वाळूचे ढिगारे. ऊन,थंडी, पाऊस आणि हिमाच्या परस्पर विरोधी टोकदार माऱ्याने स्थितप्रज्ञ होऊन वेडेवाकडे पडलेले शिलाखंड. तांब्याचे आणि चांदीचे रंग अंगावर मिरवणारे अगणित दगड-धोंडे-माती.त्यांच्यावर पडलेले ऊन अधूनमधून परावर्तित व्हायचे. ती चमक नजरेत भरत राहायची, कधी खुपायची!

कित्येक लाख वर्षांपूर्वी सृष्टीमध्ये झालेला उत्पात, त्यातून जन्माला आलेली ही दुनिया.हिमालयाचा जन्म झाला तेव्हा वर आलेला हा समुद्रतळ. त्यातच अवशेषरुपाने आपल्या आठवणी ठेवून गेलेले विविध प्रकारचे जिवाश्म.भूगर्भातून वर आलेली दगड-माती-खडकांची, इंच इंच सरकत राहणाऱ्या बर्फकड्यांनी आजूबाजूला ढकलून दिलेली किंवा खाली वाहून नेलेली आदिम दुनिया...आणि या सगळ्या उध्वस्त धर्मशाळेतही जीवनसातत्याचा संदेश देणारी सुंदर सुंदर फुले. छोटी छोटी रंगीबेरंगी झुडपे,वेली, पाणी धरून ठेवणाऱ्या जाड पानांच्या चिवट काटेरी वनस्पती. चिकाटीने जगण्याचा संदेश देणारे, उत्पत्ती स्थिती आणि लय यांचे एकाच दृष्टिक्षेपात घडणारे लालस दर्शन. आयुष्याविषयी खूप काही शिकवून जाणारे आणि त्याचवेळी माणसाच्या क्षुद्रत्वाची जाणीव करून देणारे!

चालता चालता कधी मी स्वतःच्या आतही खोल खोल जात होतो. पुन्हा बाहेर येत होतो. आजूबाजूची विविध रंगांची,   विविध आकारांची फुले मनावर गारुड करत होती. कधी एकटी-दुकटी तर कधी समूहाने फुललेली. कधी एका रांगेत, कधी गोलाकार, कधी नागमोडी, कधी चौकोनी, कधी त्रिकोणी अशा मुक्त अवस्थेत आविष्कृत होणारी... मंत्रमुग्ध करून टाकणारे असे हजारो-लाखो क्षण सोबत करीत होते.एका गोलाकार दगडाच्या भोवती अंबाड्यावर वेणी माळावी तशी निसर्गाने पिवळ्या फुलांची एक वेणी माळली होती. क्षणभर तेथे थांबलो, ते रूप डोळ्यात साठवून घेतले...  ठीकठिकाणी वेगवेगळ्या फुलांचे गुच्छ डोलत होते. जणू आमचे स्वागत करत होते. पण त्यांच्याकडे लक्ष द्यायला आम्हाला वेळ होता का? जमिनीतून जणू ओसंडून वर यावा तसा एक गुच्छ एकदम समोर आला. डोलू लागला, जणूकाही तो माझ्यासाठीच जन्माला आला होता. मी मंत्रमुग्ध होऊन त्याला 'हाय' केले... वेगवेगळ्या रंगांची, वेगवेगळ्या आकाराची फुले मी पाहत होतो. त्यांच्याशी बोलत होतो. "तुम्ही छान आहात, सुंदर आहात, मला आनंद दिलात. मी तुमचा आभारी आहे थँक्यू सो मच."असे मी त्यांना सांगत होतो. एकहार्ट टोले यांनी

म्हटले आहे की "तुम्ही पहात असलेल्या फुलाला जरूर सांगा ते किती सुंदर आहे; नाहीतर त्याला ते कोण सांगणार?" आनंद हा मुक्कामाच्या ठिकाणी असतो की प्रवासाच्या मार्गावरच शोधायचा असतो? मी मलाच प्रश्न करत होतो आणि त्याची उत्तरे शोधत होतो.

वर जाताना, खाली उतरताना, वळताना, तोल सावरताना,
फुलापानांची निरीक्षणे करताना, डोंगरदऱ्या नजरेत साठवून घेताना मी जणू निसर्गाचाच एक भाग होऊन गेलो होतो. कधी उन्हाचे चटके, कधी प्रसन्न हवेच्या झुळका, कधी भौतिकाचे विस्मयचकित करणारे दर्शन, तर कधी अलौकिकाचा भास आणि सोबत ती खडतर रपेट.  शरीराची आणि मनाची जणू झाडाझडती घेतली जात होती.गंमत म्हणजे शरीरात अनावश्यक वाढ झालेल्या अनेक ग्रंथी या प्रवासात आपोआप विरघळून गेल्या. मनातील जळमटे निघाली. सगळे कानेकोपरे कळत- नकळत स्वच्छ होत गेले. मनातील मृतप्राय संवेदनांचे तळ लख्ख झाले.आतील पाझर पुन्हा मोकळे झाले. मुक्त, मोकळे, स्वतंत्र वाटायला लागले. ओठावर चक्क गाणी येऊ लागली. मी काही गायक नाही. सूर-तालाचे मला ज्ञान नाही. तरीही मी गाऊ लागलो. मला कोणी थांबवू शकत नव्हते. सुचतील ती गाणी मी प्रसन्नचित्ताने  म्हणत, त्यांची मजा घेत चालत होतो...काही ठरावीक ओळी हट्टाने पुनःपुन्हा ओठी येत होत्या. 'गा विहगानो माझ्यासंगे, सुरावरी हा जीव तरंगे...' ही त्यातलीच एक.'या भवनातील गीत पुराणे...' ही दुसरी. मध्येच मी एकदम कुमारांच्या भजनांकडे खेचला जात होतो. 'गगन मे आवाज हो रही है झिनी झिनी' आणि 'अवधूता, गगन घटा गहरानी रे ऽऽऽ' या ओळींनी जणू माझा ताबा घेतला होता. यामागे कसले काही संदर्भ नव्हते की काही तर्कशास्त्र नव्हते. पण जे सुचेल ते मी म्हणत होतो. खरेतर त्या क्षणी मला कुणाची फिकीरसुद्धा वाटत नव्हती. मी स्वतःवर खूश होतो. मधूनच पानाफुलांशी बोलत होतो. त्या क्षणी माझा तो सहजोद्गार होता. त्या क्षणी मी फक्त माझा होतो. जणू मी मला सापडलो होतो...

लहानमोठे चढउतार पार करता करता जीव अगदी मेटाकुटीला आला. युगानुयुगे चालतच आहोत असे वाटत होते.करता करता एका शिखरमाथ्याशी म्हणजे अर्थातच पुढील नव्या शिखराच्या पायथ्याशी 'बंगाली बेस कॅम्प'वर पोहोचलो. सभोवती उंच उंच शिखरे. मधील खोलगट भागात पाच पन्नास माणसे बसू शकतील अशा तऱ्हेची सपाट जागा. दूरवर खाली कुठेतरी पाण्याची सोय. त्यामुळे गिर्यारोहक येथे कॅम्प लावणे पसंत करतात.तेथे सर्वांनी  आडवे होणे पसंत केले. जागा मिळेल तिथे पाठ-पिशवी उशाखाली घेऊन, तोंडावर रूमाल टाकून प्रत्येकजण आडवा झाला. ऊन मी म्हणत होते.चटके बसत होते.

थोडी विश्रांती झाली.पण फार वेळ बसून चालणार नव्हते. अजून खूप मोठा पल्ला गाठायचा होता. क्षितिजाजवळची पर्वतरांग खुणावत होती. तेथून निघताना आठवण म्हणून  चेंडूएवढा एक पांढराशुभ्र जड दगड मी सोबत घेतला. दगड कसला एक प्रकारचा धातूचा गोळाच तो! आता हे लिहित असताना माझ्या टेबलावर समोरच दिसत आहे.आमच्या या भ्रमंतीची सतत आठवण करून देत राहणार आहे तो!

आपण पैशांच्या श्रीमंतीसाठी जगतो की अनुभवाच्या हे एकदा ठरवून घेणे प्रत्येकासाठी आवश्यक असते. मागे लडाखला  गेलो असता सिंधू नदीच्या भारतातील प्रवेशस्थळी आम्ही सारे थांबलो होतो. तेथून निघताना अनेकांनी

त्या नदीतील छोटेमोठे रंगीबेरंगी दगड आठवण म्हणून सोबत घेतले. दगड ही आठवण असू शकते का? का नाही? इतरांसाठी ते दगड असतील पण जो तेथे जाऊन आला आहे त्यासाठी ती लाख मोलाची आठवण असते! तो दगड त्याच्यासाठी रत्नाच्या मोलाचा. अनुभवांची श्रीमंती म्हणतात ती हीच! ती कधी पैशांनी मोजता येत नाही.

पुढे निघण्याची वेळ झाली.'छोटी छोटी पावले उचलत चाला म्हणजे दम लागणार नाही' असे यतीन सांगत होता. पण ते तंत्र काही अंगवळणी पडत नव्हते. दगड-धोंड्यातून चालताना पाऊले वेडीवाकडी पडत होती. शेवटी शेवटी तर एखादे पाऊल उचलणेही अवघड झाले. कमरेपासून आपण लुळे झालो आहोत की काय अशी स्थिती झाली. दोन्ही हातांनी एक पाय उचलावा आणि पुढे ठेवावा, मग दुसरा उचलावा आणि पुढे ठेवावा अशी वेळ आली. आमची ही अवस्था बघून यतीन म्हणायचा "आता अगदी थोडे राहिले" पण थोडे या शब्दाला तिथे काहीच अर्थ राहत नाही हे आजवरच्या अनुभवावरून आधीच लक्षात आले होते. जवळ वाटणारे ते 'थोडे अंतर' कायम पुढे पुढेच सरकत असते आणि जीवनाचा प्रवाससुद्धा असाच नाही का?

एवरेस्टविरांच्या अनेक आठवणी मी वाचल्या आहेत. त्यांच्या चित्रफिती पाहिल्या आहेत. वर अखेरच्या टप्प्यात हिलरी-स्टेपजवळ पोचल्यानंतर शब्दशः एक पाऊल उचलायचे, थांबायचे, श्वास घ्यायचा. दुसरे पाऊल उचलायचे, थांबायचे, श्वास घ्यायचा... अशा पद्धतीने  चालावे लागते.एव्हाना आमचीही अगदी तशीच स्थिती झाली होती. पण हिम्मत गोळा करत, धडपडत,फरपटत अखेर कॅम्पवर पोहोचलो. शिखरावरचा एक छोटासा गवताळ-ओला, भाग देबूने कॅम्पसाठी निवडला होता. उजव्या हाताला दगड-मातीचा एक मोठा ढिगारा.
मी चंदेरी दगड-मातीच्या त्या ढिगाऱ्यावर बसून राहिलो. अंगातील सारे त्राण नाहीसे झाले होते.खाली पाहिले तर दरीच्या तळाशी पाचूच्या रंगाचे पाणी साठलेले. एकाग्रचित्त होऊन त्या पाण्याला मी जणू नजरेने स्पर्श केला... 'पाहताना फक्त पहायचे, ऐकताना फक्त ऐकायचे...' हेच वर्तमानात राहणे... समाधी-अवस्थेत गेलो. तोवर तंबू लागले होते. चहापान तयार होते. काहीतरी गरम गरम खाल्ले चहा घेतली. पुन्हा तरतरी, पुन्हा हुरूप, पुन्हा नवे चैतन्य, पुन्हा नवे शिखर गाठण्याची आस...

आता आम्ही समुद्रसपाटीपासून पंधराहजार फूट उंचीवर आलो होतो. आम्हाला गाठावयाचे बागिनीतील सर्वोच्च शिखर मात्र वरच्या बाजूला अजून थोडे दूर होते. जवळपास तीनशे फुटांचे अंतर चढून जायचे होते. पण ते तीनशे फूट म्हणजे भूगोलाच्या पुस्तकातील एखादे पान उलटण्याइतके सोपे नव्हते. नियोजित कार्यक्रमाप्रमाणे आज येथे मुक्काम करून विश्रांती घेऊन दुसऱ्या दिवशी सकाळी तेथे जायचे होते. पण अमित आणि त्याच्या मित्रांनी आजच तिकडे जाऊन येऊया अशी सूचना केली. कारण पूर्ण संध्याकाळ हाताशी रिकामी होती. तिथे जाऊन यायला दीड-दोन तास लागणार होते. एवढा वेळ येथे बसून राहण्यापेक्षा वर जावे म्हणजे दुसऱ्या दिवशी सकाळी 'गरूड कॅम्प'वरूनच परतीचा प्रवास सुरू करता येईल असा निर्णय झाला. तो योग्यही होता. कारण पुन्हा एकदा द्रोणागिरी येथील ती भयंकर दरी उतरून जायची कल्पना छातीवर दडपण आणत होती. थोडा मोकळा वेळ हाताशी असणे सर्वांच्याच हिताचे होते. मग साऱ्यांनी वर जाण्याची तयारी सुरू केली. महिलावर्गाच्या उत्साहाचा कणा पूर्णपणे मोडून पडला होता.आता आणखी पुढे जाणे म्हणजे आगीतून फुफाट्यात पडण्यासारखे आहे असे त्यांना वाटत होते. कॅम्पवर थांबणे त्यांनी पसंत केले.आम्ही पुढे निघालो.

पुढील चढाईचे नेतृत्व देबूने आता बिपिनकडे सोपवले होते. तोही जिद्दीचा आणि तयारीचा लिडर. बर्फ फोडण्याची कुऱ्हाड (आईस सॅक) दोरखंडाचे एक वेटोळे आणि दोन सहाय्यक मदतीला घेऊन तो पुढे निघाला. त्याच्यामागून आम्ही निघालो. आता मी 'चद्दर ट्रेक'साठी घेतलेला ओव्हरकोट घातला होता. त्याला डोक्यावरून घालायचे टोपरे जोडलेले होते. पाऊस आणि हिमवृष्टी झाल्यास त्यापासून आता माझे नीट रक्षण होणार होते. हळूहळू सारे वर निघालो. दिशा अंधारून आल्या होत्या. पाऊस पडत होता. पण आता थांबायला वेळ नव्हता. हिमनदी आणि मोरेन अशा दोन्हींचे मिश्रण असणाऱ्या तिरप्या तीव्र डोंगरउतारावरून पुढे पुढे सरकत, वाहणारे नाले, ओहोळ पार करत शेवटच्या टप्प्यात प्रवेश केला. तेथे समोर ते शेवटचे सुमारे शंभर फुटाचे उंच टेकाड खुणावू लागले. त्यावर पोचायचे होते. तिथे आमच्या चढाईचा पूर्णविराम होणार होता. हौशी गिर्यारोहकांसाठी बागिनि ग्लेशियर्सचा एका अर्थी तो 'डेड एंड' होता.

हवेतील प्राणवायू कमी झाल्याचे स्पष्टपणे जाणवत होते श्वासोश्वासाची गती वाढली होती,नाका-तोंडातून वाफा बाहेर पडताना 'दिसत' होत्या. दर दोन-चार पावल्यानंतर  थांबावे लागत होते.एकेक पाऊल उचलणे कठीण जात होते. कोणीतरी एक अज्ञात शक्ती हळूहळू पुढे खेचत नेत असल्यासारखे आम्ही वरवर चाललो होतो. त्या शिखरावर पोहोचणे हा जणू जन्म-मरणाचा प्रश्न झाला होता. आम्हाला ते शिखर 'सर' करायचे नव्हते तर गाठायचे होते. निसर्गात काही सर करू पाहणे हा मूर्खपणा तर नम्रपणे त्याला सामोरे जाणे हा शहाणपणा... पण तेही का? कशासाठी? काय प्राप्त होणार होते त्यामुळे? एका एव्हरेस्टवीराला कोणीतरी प्रश्न विचारला, तुम्ही त्या शिखरावर का गेलात? तर त्याने एवढेच उत्तर दिले की 'ते तेथे आहे म्हणून!'

वर चढण्यासाठी रस्ता असा नव्हताच. पाऊल ठेवण्यापुरती जागा शोधून तेथे पाऊल ठेवत वर जायचे एवढेच हाती होते. शरीर आणि मन जणू बधिर झाले होते. धडपडत, घसरत, बसत-उठत, सरकत,सरकत वर निघालो. पाऊस होताच त्यात वाराही तुफान सुटलेला. सर्वात शेवटी मी आणि माझ्या मागे यतीन. आणि अखेर एका क्षणी वर पोहोचलो. येस,'जितम् मया...' १५०९३ फूट! त्या अस्पर्श कुवार माथ्यावर स्वतःला झोकून दिले. पुन्हा उठलो.अंगात नवा जोम संचारला होता.. मला एकदम आनंदाचे भरते आले. मी नाचायचा बाकी राहिलो. खूप एक्साईट झालो होतो. आयुष्यातील एक स्वप्न पूर्ण झाले होते. गाडीत बसून यापूर्वी यापेक्षा अधिक उंच शिखरांवर गेलो होतो. पण त्यात अशी मजा नव्हती, स्वतःचे कर्तृत्व काही नव्हते. रुईंगपासून सुमारे आठ हजार फूट चढत चढत वरती येणे हे एक वेगळेच साहस होते...वर पंधरा-वीस जणांना सामावून घेईल एवढी हत्तीच्या पाठीसारखी सपाट जागा होती अभीने पिशवीतून तिरंगा काढला. एकेकाने तो हातात घेऊन फडकवला. सर्वांनी उस्फूर्तपणे राष्ट्रगीत म्हटले. आता ते केवळ राष्ट्रगीत नव्हते तर आमच्या आत्मशोधाचे, आमच्यातील ध्येयासक्तीचे, आमच्यातील 'अनंत-आशे'च्या अम्लान निर्झराचे प्रतीक ठरले होते.

मी वर पाहिले. काळ्या-पांढऱ्या ढगांनी भरलेले अथांग आकाश. ढगांच्या मागे हात धुवून लागल्यासारखी तुफानी हवा. दूरवर नजरेच्या टप्प्यात सगळीकडे पसरलेला बर्फ.

समोर दुणागिरी,चांगभांग आणि कलंका यांची गगनचुंबी शिखरे. खाली खोल खोल दरी. दरीत अधूनमधून साठलेले पाचूच्या रंगाचे हिमजल.

४० ते ५० लाख वर्षांपूर्वी भारत आणि तिबेट यांचे भूस्तर सरकत सरकत एकमेकांवर आदळले.त्यांच्या त्या गळाभेटीत दोघांच्याही मध्ये असणारा सागरतळ वर उचलला गेला आणि शिखरांच्या स्वरूपात भूमीवर आला. लक्षावधी वर्षांपूर्वीचे दगडधोंडे, वाळू, माती, जीवाश्म, जीवजंतू, झाडझाडोरा, ज्ञात-अज्ञात खनिजे वर आली. वर येऊन विसावली.एका भयंकर उत्पातातून पुन्हा एकदा एका चिवट निर्माणाचे दर्शन घडवणारा,'उत्पत्ती-स्थिती आणि लय' हा धडा पुन:पुन्हा गिरवणारा नवा विराट प्रवास सुरू झाला...भारतभूच्या पश्चिमेकडे ३५० आणि पूर्वेकडे १५० कि.मी. रुंदी असणारी २४०० किलोमीटर लांबीची त्रिस्तरीय पर्वतरांगांची पश्चिम-पूर्व चंद्रकोर जन्माला आली - अर्थात हिमालय!

दरवर्षी अंदाजे पाच मि.मी.इतकी उंची वाढणारा, ६० मि.मी. पुढे सरकणारा, १२००० हिमनद्यांना जन्म देणारा, पाच हजार मीटर उंचीची एक हजाराहून अधिक शिखरे आपल्या अंगाखांद्यावर मिरवणारा, आठ  हजार मीटर उंचीच्या चौदा शिखरांचा मनसबदार, आणि ८८४८ मीटर उंचीच्या जगाचा मनदंड असलेल्या एव्हरेस्टचा जन्मदाता, पृथ्वीचा तिसरा ध्रुव - हिमालय! कित्येक संस्कृत्यांचा निर्माता, त्राता, धात्रा आणि विनाशकर्तासुद्धा!  या क्षणी आम्ही त्याच्या खांद्यावर उभे होतो, हे कर्तृत्व काय थोडे होते?

सृष्टीनिर्मितीच्या अतर्क्य आणि अद्भुत खेळामधील एका आगळ्या प्रवेशाचे नेपथ्य माझ्या समोर प्रकाशित झाले होते. या नेपथ्याच्या पार्श्वभूमीवरच माणसाच्या पुढील चाळीस ते पन्नास लाख वर्षांच्या तथाकथित कर्तृत्वाचे विविध नाट्यप्रवेश येथे सादर होत राहिले. पुढेही होत राहतील. त्यात कोणती नवी वळणे असतील, त्याचा उत्कर्षबिंदू कोठे असेल, तो उत्कर्षबिंदू नक्की केव्हा येणार, ते अगम्य अतर्क्य महानाट्य किती अंकी असेल हे सांगणे, समजून घेणे मानवी बुद्धिमत्तेच्या पलीकडचे! मी स्वतःला लेखक,कवी, नाटककार मानतो पण आपण किती खुजे आहोत हे पहिल्यांदाच मला बागिनीतील त्या सर्वोच्च शिखरावर उभे असताना लक्षात आले...

आपण सतत 'मी मी', 'माझे माझे' करत फिरत राहतो. कितीतरी गोष्टी छातीशी कवटाळून बसतो.आयुष्यभर तडफड, धडपड, किती भानगडी, किती खून-खराबा,किती कोर्ट-कचेऱ्या, करत बसतो त्याचा हिशेब नाही ... आणि या सगळ्याचा शेवट काय, तर शून्य! शेक्सपियरने म्हटले आहे nothing will come out of nothing. अभावातून काहीतरी निर्माण होत आहे असे मानण्याचा केवळ एक भ्रम! बालिशपणा! 'पूर्णात पूर्णमिदम सर्वं' ही वेदातील प्रार्थनाही हेच सांगते. कशात काहीही मिळवा, कशातून काहीही वजा करा बाकी शून्य!

शिव-शंकराची ती दंतकथा त्या क्षणी आठवली. त्याच्या दर्शनाला जायचे तर एकेक आसक्ती सोडत वर जायचे असते. इथवर पोहोचेपर्यंत 'मी' आणि 'माझे' या किती क्षुद्र गोष्टी आहेत हे लक्षात आले होते. माझे शहाणपण, माझा पैसा, माझी प्रॉपर्टी, माझी माणसे, माझे गाव या सर्वांच्या पलीकडे जाऊन, या सगळ्याची आसक्ती सोडून आपण या विश्वाचा एक भाग आहोत हे लक्षात घेणे अधिक महत्त्वाचे आहे हे लक्षात आले. किती साधी पण किती

मोठी गोष्ट होती ही! आता आणखी समजून घेण्यासारखे, सोडण्यासारखे काय उरले होते माझ्याजवळ? हळूहळू मी जणू सूक्ष्मात जाऊ लागलो. 'गगन मे आवाज हो रही है झिनी झिनी'च्या तंद्रित बुडून गेलो...त्या सुरांच्या लपेटित अधिकाधिक आकसत अगदी अणुपेक्षा थोकडा होत गेलो. सरणारा एकेक क्षण नवनवे भान मुखर करू लागला. तुला जे तुझे वाटते ते तुझे नाही. तू जे गाणे गातोस ते तुझे नाही. तू ते फक्त ऐकत आहेस आणि पुढे पाठवत आहेस. सावध हो. वर्तमानक्षणात जग. क्षणिक गोष्टींच्या पाशात अडकू नको. साऱ्याचा शेवट दुःखद आहे हे लक्षात घे. इथे तुझे असे काहीच नाही. येताना तू काही घेऊन आला नाहीस आणि जाताना काही घेऊन जाणार नाहीस. निरर्थक गोष्टींसाठी जीव पाखडू नकोस. हाती असलेले क्षण निरपेक्ष आनंदाने जगण्याचा प्रयत्न कर... तुझ्या येथे असण्याची खरी ओळख म्हणजे तू या सगळ्याच्या पलीकडे असणारे एक आदिम भान आहेस! 'सुप्रीम अवेअरनेस'!

आतील पाझर आता पूर्णपणे उमलले होते. सत्यदर्शनाच्या तहानेने मी व्याकुळ झालो होतो पण तहान भागवण्यासाठी जे पाणी मी बाहेर शोधत होतो ते माझ्या आतच होते. मी आतून भरून येऊ लागलो होतो, तुडुंब होऊ लागलो.वर ढगांनी भरून आलेले आकाश. आणि खाली तुडुंब भरून आलेला मी. दोन तुडुंब अस्तित्वे एकमेकांच्या जवळ आली आणि एकमेकात विलीन झाली. जणू जीवाशिवाची भेट!'अवधूता, गगन घटा गहरानी रेऽऽऽ' या भजनाने मनाचा ताबा घेतला. ही भैरवी की नांदी? एकूणच प्रवासाचा शेवट की प्रारंभ? की उत्पत्ती-स्थिती आणि लय या त्रांगड्यातील त्रिशंकू अवस्था? काहीही असो, त्या क्षणी मी केवळ एक सूर होऊन गेलो...त्याची कंपने माझ्यातून बाहेर पडत हळूहळू आसमंतात विरून नाहीशी होऊ लागली...

सृष्टी निर्माण झाली तेव्हा प्रारंभी काहीच नव्हते.आदी-अंत नव्हता,आकाश-अंतरिक्ष नव्हते, सत्य-असत्यही नव्हते. डोक्यातील भजनाचे सूर अधिक गहिरे होत आसमंतात विरघळून चालले... एक अज्ञात पोकळी मला आपल्या आत ओढून घेऊ लागली. माझ्यापाशी आता माझे असे काहीही उरले नव्हते.मी माझा उरलो नव्हतो. उरले होते फक्त काही शब्द,काही कल्पना! 'नासदीय सूक्ता'त म्हटले आहे की सृष्टीचा जन्म 'कवी-कल्पने'तून झाला! 'कवयो मनीषा...' त्या आत्मसाक्षात्कारी जाणिवेचा लखलखाट झाला. इतका की जणू तीन्ही लोक उजळून निघाले.आता माझ्या चेहऱ्यावर हसू होते. मी का हसत आहे हे कुणालाही कळणार नव्हते.मग हळूहळू ते हसूही आसमंतात विलीन होत गेले. शेवटी उरले ते केवळ अनादी-अनंत आकाश आणि त्याची गूढ निळाई!

***